follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

किंमत ५/- रूपये

RNI Regd. No. 72105/99 वर्ष २५ अंक २१८ सातारा मंगळवार, दि. १६ एप्रिल २०२४ पाने ६ (सुप्रभात)



# जोरदार शक्ती प्रदर्शनाने शशिकांत शिंदेंचा अर्ज दाखल

## साताऱ्यात शरद पवार यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांची भव्य रॅली, दिग्गज नेत्यांमुळे राजकीय पारा वाढला

**राजदंड / सातारा**

**'तुतारीचा नाद' आणि 'ताशाचा कडकडाट' अशा जल्लोषात महाविकास आघाडीचे शाहूनगरीमध्ये दमदार शक्ती प्रदर्शन झाले. महाविकास आघाडीच्या दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी भव्यशक्ती प्रदर्शन करत आपली ताकद दाखवून दिली. राष्ट्रवादी सुप्रिमो शरद पवार यांच्या उपस्थितीत आमदार शशिकांत शिंदे यांनी खासदारकीचा अर्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे सोमवारी दाखल केला. 'मी येतोय तुमचा आशीर्वाद घ्यायला, फक्त साथ तुमची हवी' या टॅगलाईनचे पोस्टर साताऱ्यात जागोजागी लक्ष वेधून घेत होते. गांधी मैदान ते जिल्हाधिकारी कार्यालय अशी हजारो कार्यकर्त्यांची भव्य रॅली काढण्यात आली होती.**





महायुतीचा सातारा लोकसभेचा उमेदवार ठरला नसला तरी महाविकास आघाडीने सातारा लोकसभेसाठी आमदार शशिकांत शिंदे यांची निवड केली . सोमवारी शिंदे यांचा अर्ज वाजतगाजत दाखल करण्यासाठी सकाळी सव्वा अकराच्या दरम्यान स्वतः शरद पवार हेलिकॉप्टरने सातारा सैनिक स्कूलच्या मैदानावर दाखल झाले .यावेळी कराड दक्षिणचे आमदार काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण, खासदार श्रीनिवास पाटील, आमदार बाळासाहेब पाटील, शिवसेनेचे नितीन बानुगडे पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुनील माने विक्रम सिंह पाटणकर यांनी पवार साहेबांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले .तेथून गाड्यांचा ताफा थेट गांधी मैदानाकडे रवाना झाला . तत्पूर्वी सकाळी अर्ज दाखल करण्यापूर्वी आमदार शशिकांत शिंदे यांनी हुमगाव तालुका जावळी येथील हुमजाई देवीचे सपत्नीक दर्शन घेतले .

गांधी मैदानावरून भव्य प्रमाणात सजवलेल्या रथावर शरद पवार आमदार शशिकांत शिंदे आणि महाविकास आघाडीचे नेते स्वार झाले ताशांचा कडकडाट आणि तुतारीचा निनाद अशा वातावरणात पावणे बाराच्या दरम्यान रॅलीला सुरुवात झाली . राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत गांधी मैदानाचा परिसर दणाणून सोडला, यावेळी गोल बाग येथील प्रतापसिंह महाराज थोरले, शाहू चौक येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा तसेच शिवतीर्थावर छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले . साताऱ्यात गांधी मैदान ते पोवई नाका अशी भव्य रॅली निघाली या रॅलीला सातारकरांनी सुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला परिणामी मोती चौकाकडून नाक्याकडे जाणारी वाहतूक कर्मवीर पथामार्गे वळवण्यात आली होती . गांधी मैदानावर सुद्धा पोलीस आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते यांच्यात प्रचंड रेटारेटी झाली कार्यकर्त्यांचा उत्साह आणि राष्ट्रवादीचे शक्ती प्रदर्शन यामुळे महायुतीला जोरदार राजकीय संदेश गेला आहे .आमदार शशिकांत शिंदे यांनी दुपारी सव्वा एकच्या दरम्यान शरद पवार यांच्यासह निवडक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपला लोकसभेचा अर्ज दाखल केला मात्र सुरक्षेच्या कारणास्तव जिल्हाधिकारी कार्यालयात ठराविक पदाधिकाऱ्यांना प्रवेश देण्यात आला होता . रॅलीची पोवई नाक्यावरच सांगता झाली त्यानंतर पुढील बैठकीसाठी शरद पवार आणि महाविकास आघाडीचे नेते हॉटेल प्रीती एक्झिक्युटिव्ह येथे रवाना झाले महाविकास आघाडीचा सोमवारचा दिवस शक्तिप्रदर्शनाचा ठरला सातारा जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो कार्यकर्ते या रॅलीमध्ये सहभागी झाले होते महायुतीचा उमेदवार जाहीर झाला नसला तरी खासदार उदयनराजे भोसले यांनी प्रचारात मोठीच आघाडी घेतली आहे . त्यांना उमेदवारी घोषित करण्यावर मुंबईत महायुतीच्या नेत्यांच्या जोर बैठका सुरू होत्या मात्र महाविकास आघाडीने जमवलेली गर्दी आणि त्यातून झालेले शक्तिप्रदर्शन यामुळे सातारा लोकसभेचा सामना चुरशीने रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## आमचे साताऱ्यातील नाणे खणखणीत, राजांच्या अवस्थेबद्दल काय बोलायचे? - शरद पवार

- सातारा पुरोगामी विचारांचा असून परिवर्तन घडणारच

**राजदंड / सातारा**

सातारा लोकसभेसाठी आम्ही उभे केलेले नाणे खणखणीत आहे, ते राजे आहेत आणि आम्ही प्रजा आहोत. राजांच्या अवस्थेबद्दल आम्ही काय बोलायचे?, असा तिरकस टोला लगावून सातारा पुरोगामी विचारांचा असून येथे परिवर्तन घडणारच, असा ठाम विश्वास राष्ट्रवादी सुप्रिमो शरद पवार यांनी व्यक्त केला.



सातारा येथील प्रीती एक्झिक्युटीव्ह हॉटेलमध्ये खा. पवार यांना उदयनराजेंच्या उमेदवारीबद्दल पत्रकारांनी प्रश्न विचारल्यानंतर पवारांनी वरील विधान केले. आमदार शशिकांत शिंदे यांचा लोकसभेचा उमेदवारी अर्ज भरण्याकरता पवार जिल्हा दौऱ्यावर होते. अर्ज भरल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना विविध प्रश्नांना उत्तरे दिली. यावेळी आमदार पृथ्वीराज चव्हाण, खासदार श्रीनिवास पाटील, आमदार शशिकांत शिंदे, शिवसेना उपनेते नितीन बानुगडे पाटील, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुनील माने उपस्थित होते.

पुढे बोलताना पवार म्हणाले की, देशात केंद्र सरकारचा ज्या पद्धतीने कारभार सुरू आहे, तो एककेंद्री प्रवृत्तीचा आहे. त्यामुळे परिवर्तन घडवण्याच्या दृष्टीने इंडिया आघाडी (पान ३ वर)

### पुन्हा एकदा शरद पवार...

**सोमवारी आमदार शशिकांत शिंदे यांनी जरी अर्ज भरला तरी या रॅलीचे खरे नायक ठरले ते राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार. शरद पवार यांचे गांधी मैदानावर आगमन होताच राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना चांगला जोश आला. त्यांनी जोरदार घोषणाबाजी सुरू केली. यावेळी राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीच्या सर्व घटक पक्षांचे दिग्गज नेते उपस्थित होते. राष्ट्रवादीचे नाराज जिल्हाध्यक्ष सुनील माने यांनीसुद्धा रॅलीला आवर्जून उपस्थिती लावत आपला कोणताही गैरसमज नसल्याचे दाखवून दिले. सातारा जिल्हा हा पवारांचा विचार मांनणारा जिल्हा आहे, पवार जे सांगतात तेच सातारकर मतदार करतात, हा गेल्या लोकसभा निवडणुकीचा अनुभव आहे. त्यामुळे पवारांनी दिलेल्या उमेदवाराला पाठिंबा देण्यासाठी सातारकर स्वतःहून रस्त्यावर आलेले दिसले.**

## सांगलीत भाजपला धक्का; माजी आमदार विलासराव जगताप यांनी दिला राजीनामा

- भाजपच्या उमेदवाराला विरोध
- विशाल पाटील यांना पाठिंबा

**राजदंड / सांगली**

सांगली लोकसभा निवडणुकीची सद्या राज्यभर चर्चा आहे, एकीकडे महविकास आघाडीत उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू असताना भाजपमध्ये सगळं आलबेल नाही, जतचे भाजपचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी भाजपच्या सदस्य पदाचा राजीनामा देत, वसंतदादांचे नातू विशाल पाटील यांना पाठींबा जाहीर केला आहे.



सोमवारी जतचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी आपली भूमिका जाहीर करण्यासाठी मेळावा आयोजित केला होता, या मेळाव्यात त्यांनी ही घोषणा केली. दरम्यान त्यांच्या सोबत माजी मंत्री अजितराव घोरपडे यांनीं संजयकाकांच्या उमेदवारीला विरोध केलेला होता, तसेच खासदार संजय राऊत त्यांना महविकास आघाडीचे वास्तव सांगत विशाल पाटील यांना पाठींबा दिला होता.

भाजपमध्ये खसदार संजयकाका पाटील यांना उमेदवारी मिळताच जत तालुक्यात त्यांच्या विरोधात कार्यकर्ते तयार असल्याचा आरोप करीत विलासराव जगताप यांनी खासदार पाटील यांच्या उमेदवारीला उघड उघड विरोध केला होता. त्यावेळी संजयकाका गटाने त्यांची पक्षातून हकलपट्टी करावी अशी मागणी केली होती, मात्र पक्षाने तशी कारवाई न करता त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता.

आमदार विलासराव जगताप यांनी सोमवारी झालेल्या मेळाव्यात विशाल पाटील यांना पाठींबा देत असल्याचे जाहीर केले. त्यांनी भाजपा सदस्यत्वाचा राजीनामा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठवला आहे. यामध्ये म्हंटल आहे की ,'' भारतीय जनता पार्टीमध्ये मी, आजपर्यंत पक्षवाढीसाठी काम केले आहे. परंतु पक्षाने त्याची दखल न घेता आलिकडे माझ्या विरोधात गट बांधण्याचे व माझे अवमूल्यन करण्याचे काम वरिष्ठ पातळीवरुन करण्यात आले आहे. ते मला सहन करणे शक्य नाही. त्यामुळे मला स्वतंत्रपणे विचार करण्यासाठी मी पक्षाच्या जबाबदारीतून मुक्त होतो. तरी मी आपल्या भा.ज.पा.पक्षाचा राजीनामा देत आहे.''

## यंदा सामान्यपेक्षा चांगला मान्सून

**नवी दिल्ली :** भारतीय हवामानशास्त्र विभागाने सोमवारी सांगितले की, यावेळी जून ते सप्टेंबरपर्यंत मान्सून सामान्यापेक्षा चांगला राहील. हवामान विभाग सरासरीपेक्षा १०४ ते ११० टक्के पाऊस चांगला मानतो. हे पिकांसाठी चांगले लक्षण आहे. दरम्यान, महाराष्ट्रासह देशाच्या २५ राज्यांमध्ये सामान्यापेक्षा जास्त पाऊस पडणार असल्याचेही हवामान खात्याने म्हटले आहे.

आयएमडीने म्हटले आहे की, २०२४ मध्ये १०६% म्हणजेच ८७ सेमी पाऊस पडू शकतो. ४ महिन्यांच्या पावसाळी हंगामासाठी दीर्घ कालावधीची सरासरी ८६८.६ मिलीमीटर म्हणजेच ८६.८६ सेंटीमीटर आहे. म्हणजे पावसाळ्यात इतका एकूण पाऊस पडला पाहिजे.

यापूर्वी ९ मार्च रोजी 'स्कायमेट' या खासगी हवामान संस्थेने मान्सूनचा अंदाज जाहीर केला होता.

## फडणवीसांकडून माढ्यात 'डॅमेज कंट्रोल'; उत्तमराव जानकरांशी तासभर खलबतं

**राजदंड / नागपूर**

शरद पवारांनी माढा लोकसभा मतदारसंघ पुन्हा मिळवण्यासाठी महायुतीच्या अडचणी वाढवल्या आहेत. भाजपच्या धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हाती तुतारी दिली आहे. सोलापुरातील प्रसिद्ध धनगर नेते उत्तमराव जानकर मोहिते पाटील यांना पाठिंबा देण्याच्या तयारीत असल्याचे पाहून त्यांची नाराजी दूर करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तमराव जानकर यांना नागपुरात बोलावून घेत त्यांच्याशी तासभर चर्चा केली.



फडणवीसांनी जानकर यांना नागपुरला बोलावून घेतले. त्यांच्यासाठी बारामतीला खास चार्टर्ड प्लेन पाठवण्यात आले होते. या विमानाने जानकर, भाजप खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, आमदार जयकुमार गोरे, शहाजी बापू पाटील नागपुरला आले. फडणवीस यांनी नागपुरात या सगळ्या नेत्यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. फडणवीस यांनी जानकर यांच्यासोबत तासभर संवाद साधला.

धैर्यशील मोहिते पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात प्रवेश केल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी सोलापूर जिल्ह्यात लक्ष घातले आहे. उत्तमराव जानकर आणि माझे ठरले असल्याचे जयंत पाटील यांनी सांगितल्यानंतर फडणवीसांनी तातडीने जानकर यांना नागपूरला बोलावून घेतले. दोघांमध्ये एक तास बैठक झाली. त्याबद्दल जानकर यांनी माहिती दिली.

देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर उत्तमराव जानकर म्हणाले की, निश्चितपणाने माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघाचा विषय होता. त्या मतदारसंघाच्या संदर्भाने आम्ही फडणवीसांना भेटायला नागपूरमध्ये आलो. फडणवीस यांच्यासोबत आमची एक तास बैठक झाली. या बैठकीत आमचे काय मुद्दे होते तर काही अडचणी देखील होत्या. त्यावर सविस्तरपणाने चर्चा झाली. त्यामध्ये सकारात्मक चर्चा याठिकाणी झालेली आहे. आजच आम्ही काही प्रमुख नेते मंडळी संध्याकाळी ७ वाजता बसून बैठकीत निर्णय घेऊ, असे जानकर यांनी सांगितले. येथे झालेली चर्चा आणि विश्लेषण आमच्या कार्यकर्त्यांसमोर मांडून बैठकीत सकारात्मक निर्णय घेऊ असे ते म्हणाले.

## शरद पवार यांच्याकडून महायुतीला पुन्हा धक्का

### आप्पासाहेब जगदाळेंसह भरत शहा, कांतीलाल झगडे, विलास माने राष्ट्रवादीत प्रवेश करणार

**राजदंड / इंदापूर**

पुणे जिल्हा सहकारी बँक व इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक आप्पासाहेब जगदाळे, कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा व निराभिमाचे उपाध्यक्ष कांतीलाल झगडे यांच्यासह बाजार समितीचे सभापती विलास माने हे मंगळवारी (दि.१६) राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात पक्षप्रवेश करणार आहेत,अशी माहिती तालुकाध्यक्ष अॅड. तेजसिंह पाटील व कार्याध्यक्ष महारुद्र पाटील यांनी दिली. ते इंदापूर येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी राज्य कार्यकारणी सदस्य अमोल भिसे,कार्याध्यक्ष महारुद्र पाटील,शहराध्यक्ष अॅड.इनायतअली काझी,तालुकाध्यक्षा छाया पडसळकर, कालिदास देवकर उपस्थित होते.

अॅड. पाटील म्हणाले की, शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींचे आजी-माजी सरपंच, नगरपरिषदेचे नगरसेवक यांच्यासह हजारो कार्यकर्ते तुतारी हाती घेणार आहेत. सदरील







पक्षप्रवेशाचा कार्यक्रम येथील वाघ पॅलेस या ठिकाणी होणार आहे.

जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे व कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा यांना इंदापूर तालुक्यात मानणारा मोठा वर्ग आहे.त्यांच्या पक्षप्रवेशामुळे अनेक राजकीय गणिते बिघडू शकतात. त्यामुळे लोकसभा, विधानसभा व नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये अजित पवार यांच्या पक्षापुढे इंदापूर तालुक्यातून तगडे आव्हान असणार आहे.

### हर्षवर्धन पाटील यांना मोठा झटका....

**कर्मयोगी व नीरा भीमा हे दोन सहकारी साखर कारखाने भाजपा नेते हर्षवर्धन पाटील यांच्या ताब्यात आहेत. दोन्ही कारखान्याचे उपाध्यक्ष शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश करणार आहेत. त्यामुळे हर्षवर्धन पाटील यांच्यासह महायुतीला मोठा झटका बसला आहे.**

## सांगलीत विशाल पाटील यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज केला दाखल

**राजदंड / सांगली**

सांगली लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीत सुरू असलेले द्वंद अजूनही थांबण्याचे नाव घेत नाही. ठाकरे गटाच्या वतीने चंद्रहार पाटील यांना उमेदवारी दिल्याने नाराज झालेले काँग्रेसचे इच्छुक उमेदवार विशाल पाटील यांनी आज अखेर अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून सांगली लोकसभा लढण्याचा निर्धार पक्का केला आहे. त्यामुळे सांगलीत काँग्रेसला जोरदार धक्का बसला असून दुसरीकडे ठाकरे गटाचे उमेदवार चंद्रहार पाटलांची देखील अडचण होणार आहे. तर महाविकास आघाडीत देखील बिघाडी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून सांगली लोकसभा मतदारसंघ चर्चेत आहे. सांगलीची जागा महाविकास आघाडीने अधिकृतरीत्या (पान ३ वर)

## 'इन्स्टाग्राम'च्या स्टेटसवरून पिस्तुलाची विक्री करणारी टोळी उघडकीस

**राजदंड / बारामती**

इन्स्टाग्रामच्या स्टेटसवरुन तपास झाल्यानंतर पिस्तूलाची विक्री करणारी एक टोळीच बारामतीत कार्यरत असल्याचे उघड झाले. इंस्टाग्रामच्या स्टेटस वर कोयत्याचे चित्र ठेवणा-या युवकाविरुध्द बारामती तालुका पोलिसांनी तपास केल्यानंतर त्याच्याकडे पिस्तूल असल्याचेही निष्पन्न होवून त्यातून एक साखळीच पुढे आली आहे. याप्रकरणी तिघांना पोलिसांनी अटक केली आहे.

लोकसभा निवडणूकीची आचारसंहिता सुरु असल्याने पोलिस प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. पोलीस यंत्रणा सोशल मीडियावर विशेष लक्ष ठेवून आहे. बारामती तालुक्यातील सावळ येथील आकाश शेंडे याने इन्स्टाग्रामला धारदार कोयत्याचे स्टेटस ठेवल्याचे फौजदार राजेश



माळी यांना दिसले.आकाश शेंडे याला ताब्यात घेऊन त्याच्या मोबाईलची तपासणी केल्यानंतर त्याच्याकडे पिस्तूल असलेलेही फोटो पोलिसांच्या निदर्शनास आले. या बाबत चौकशी केल्यानंतर त्याचा साथीदार रोहित वणवे (रा. लाकडी, ता. इंदापूर) याच्याकडे पिस्तूल दिल्याचे त्याने तपासादरम्यान पोलिसांना सांगितले. त्या नंतर रोहित वणवे यास ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडे पिस्तूल व एक मोकळी पुंगळी सापडली.

तपासात रोहित वणवे याने हे पिस्तूल (पान ३ वर)

स्थित्यंतर

# गावजेवण नको, हवे सामाजिक परिवर्तन

राही भिडे



देश विदेशात नावाजलेल्या भारतीय संविधानाला लोकशाही राज्य व्यवस्थेमध्ये अधिक बळकट करण्याची गरज असताना पाशवी बहुमताच्या जोरावर संविधानच बदलण्याची भाषा केली जात आहे. त्या दृष्टीने सत्ताधारी भारतीय जनता पक्षाची तयारी झाली असल्याचे भाजप नेत्यांनी ठिकठिकाणी केलेल्या वक्तव्यांवरून स्पष्ट होते. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना यासंदर्भातील चाचपणी करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली होती. तेव्हापासून अधून मधून संविधान बदलण्याची चर्चा होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान तयार केले असल्यामुळे त्याबाबत आंबेडकरी जनता अधिक संवेदनशील आहे. संविधान वाचवण्यासाठी सर्व प्रकारचे लढे आंदोलने करण्याची त्यांची तयारी आहे. आंबेडकरी चळवळीतील नेत्यांची तोंडे दाही दिशांना असल्याने कार्यकर्ते विखुरले आहेत, एकत्रित ताकद नेत्यांमुळे दुभंगली आहे. नेत्यांचे स्वार्थी आणि पदासाठीचे राजकारण त्यांच्या व्यक्तिगत फायद्याचे असले, तरी ते एकूण समाज आणि देशहिताचे नाही. प्रकाश आंबेडकरांना १४ एप्रिलला डॉ. आंबेडकर जयंती कशी साजरी करायची असा प्रश्न विचारला असता गावजेवण घालायचे असे उत्तर त्यांनी दिले. गावजेवण ही समरसतावादी कृती आहे, सर्वांनी सर्वांशी चांगले संबंध ठेवायचे, एकत्र जेवायचे वगैरे. परंतु बाबासाहेबांनी देशाला दिलेल्या संविधानावरच घाला घालण्याचा प्रयत्न होतो तेव्हा गावजेवण नव्हे वैचारिक परिवर्तनाची, फुले, शाहू आंबेडकरांच्या सामाजिक परिवर्तनाची गरज आहे हे सम्यक परिवर्तनच संविधान आणि पर्यायाने देश वाचवेल. आज परिस्थिती अशी आहे की संविधानाची तोडफोड करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. मात्र कितीही तोडफोड केली तरी संविधानाच्या मूळ ढाचाला हात लावता येत नाही,याचे कारण त्यात असलेला लोकशाहीचा आत्मा. त्यामुळेच चारसौ पार चा नारा दिला जात आहे लोकसभेत चारसौ पार झाले की पाशवी बहुमताच्या जोरावर सरकारचे मनसुबे पूर्ण करायचे. १९९१ च्या निवडणुकीत रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, रा. सु. गवई, प्रा. जोगेंद्र कवाडे हे चौघेही लोकसभेवर निवडून आले होते. त्यामागे शरद पवार यांचे प्रयत्न दुर्लक्षून चालणार नाही. अनेक दलितनेत्यांना महामंडळे, विधान परिषदेचे सदस्यत्व देण्यात पवार यांचा मोठा वाटा होता. त्यानंतर देशातच काँग्रेस नेतृत्व कमी पडत गेले. काँग्रेसचा दलित मतदार अन्य गटांच्यामागे जाऊ लागला. काँग्रेसची ही मतपेढी दुरावली. महाराष्ट्रात दलित नेत्यांत एकवाक्यता राहिली नाही. एकाची दुसऱ्याबरोबर युती असली तर अन्य रिपब्लिकन तीन गटांनी अन्य तीन राजकीय पक्षांबरोबर युती करायची, असे सुरू झाले. त्यातून दलित नेत्यांचे तडजोड मूल्य कमी झाले. महाराष्ट्रातील चार रिपब्लीकन पक्षात कधी कुणाबरोबर युती करायची आणि का करायची, याची सुसंगत धोरणेच राहिली नाहीत. गेल्या काही वर्षांत प्रकाश आंबेडकर यांनी तर वंचित बहुजन आघाडीची मोट बांधल्याने रिपब्लिकन पक्षाशी त्यांचा संबंध राहिला नाही. रा. सु. गवईयांच्या निधनानंतर त्यांचा वारसा समर्थपणे पुढे चालवण्यात राजेंद्र गवईना यश आले नाही. कधी शरद पवार यांच्या पक्षाशी युती, तर कधी काँग्रेसशी.. प्रा. कवाडे यांची तर आता फारशी राजकीय ताकद राहिली नाही. आता ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कच्छपि लागले आहेत याचे आश्चर्य वाटते. आंबेडकर यांचे राजकीय उपद्रवमूल्य अधिक असले, तरी त्यांची भूमिका ही अप्रत्यक्षपणे भाजपला मदत करणारी असते. रामदास आठवले यांना सत्तेबरोबर राहताना आपल्या समाजाचे काय होते, याची आता चिंता राहिली नाही. भाजपची भलामण करताना आपल्या पक्षाच्या मूळ तत्त्वज्ञानापेक्षा त्यांची वागणूक कितीतरी वेगळी आहे हे त्यांच्याही लक्षात येत नसावे. दोन जागा मिळाल्या नाही, तर बंड करू असा इशारा देणाऱ्या आठवले यांना निमूटपणे भाजपची तळी उचलण्याची वेळ आली आहे. भाजपचे कर्नाटकातील नेते अनंतकुमार हेगडे वाचाळवीर म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी चारशे पारच्या जागा कशासाठी पाहिजेत, हे सांगताना घटना बदलण्याचे कारण दिले. यापूर्वी त्यांनी अनेकदा घटना बदलण्याची भाषा केली आहे. या पूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघातूनही घटना बदलण्याची भाषा झाली होती. त्यावर काहीच केले नाही. आताही राजस्थानमधून उभ्या असलेल्या ज्योती मिर्धा यांनी राज्यघटना बदलण्याची भाषा केली,त्यावर अपेक्षित असे काहीच पडसाद उमटले नाहीत. घटना बदलण्याची ही आवई आहे, असे सांगून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. उलट, संविधान सर्व देशात कुठे लागू आहे,असा सवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी करतात हे विशेष. *राज्यघटना* लागू नसलेला भाग देशात आहे का? अशा बुद्धिभेदातून दलितांची फसवणूक होत आहे आणि त्याला कुणीच प्रत्युत्तर देत नाही. मायावती पुतळे आणि अन्य प्रकरणाची चौकशी टाळण्यासाठी भाजपधार्जिणी भूमिका घेत आहेत. केवळ घटना बदलण्यापुरता हा विषय मर्यादित नाही.

संसदीय प्रथा, परंपरा मोडीत काढायच्या,पाशवी बहुमताच्या नावाखाली एकाधिकारशाही आणायची, विरोधी पक्षमुक्त देश करायचा आणि त्यानंतर अनियंत्रित कारभार करायचा, अशी ही सारी व्यूहनीती आहे. लोकशाहीत सत्ताधारी पक्षाइतकेच विरोधी पक्षांनाही महत्त्व असते. संपूर्ण विरोधकच मोडीत काढायचे षडयंत्र रचले जात आहे. त्यासाठी तपास यंत्रणांचा कसा वापर केला जातो, हे वेगवेगळ्या लोकांनी अहमदाबादच्या वॉशिंग मशिनमध्ये घेतलेल्या डुबकीवरून सिद्ध झाले आहेच. ही परिस्थिती पाहता संविधान बचावसाठी केवळ दलित समाजच नव्हे तर सर्व लोकशाही प्रेमी भारतीयांनी संघटितपणे विरोध करण्याची गरज आहे. आपला विरोध मतदानातून दाखवला पाहिजे. परंतु तसे दिसत नाही. मूलभूत स्वातंत्र्याला ज्या बाबासाहेबांनी महत्त्व दिले, त्या स्वातंत्र्यालाच नख लावण्याचे काम सांस्कृतिक राष्ट्रवादाच्यानावाखाली सुरू आहे. त्यासाठी जागर करावा लागतो, लढा उभारावा लागतो आणि जे कुणी हे करीत आहेत, त्यांचे सरकार उलथवून टाकावे लागते. त्याचा नेमका सर्वांनाच विसर पडला आहे. या पार्श्वभूमीवर दलित मते विभागली जाणे, त्यांचे एकगठ्ठा नसणे हे भाजपच्या पथ्यावर पडणारे आहे. 'वंचित' ने राज्यात उमेदवार दिले आहेत. त्यातील निवडून किती येतील, असा प्रश्न आहे. महायुती आणि महाविकास आघाडीत उमेदवारी न मिळालेल्यांचे वंचित' हे आश्रयस्थान झाले आहे. निवडून आले नाही, तरी पाडण्याची 'वंचित'ची क्षमता जास्त आहे. त्यामुळे या गणितात महायुतीचाच फायदा होण्याची शक्यता दिसते. नवमतदार तसेच प्रस्थापित मध्यमवर्गातला जो दलित वर्ग आहे तो अद्याप मोदी यांच्या विरुद्ध गेला असल्याचे दिसत नाही. महाराष्ट्रातल्या लोकसभा निवडणुकांमध्ये प्रकाश आंबेडकरांव्यतिरिक्त रिपब्लिकन चळवळीतला एकही नेता आक्रमक नाही. विशेषतः आठवलेंचा एकही उमेदवार रिंगणात नाही. कवाडे आणि गवई गट यांना स्वतःची ओळख राहिली नाही. यावेळी दलित मते नेत्यांबरोबर नसतील पण संविधानासारखा मुद्दा पुढे आला असल्याने संघटितपणे मतदान करतील. अतिमागास किंवा दलितांमधल्या ज्या छोट्या जाती आहेत, त्यांनी भाजपच्या धर्मवादी मनुवादी प्रवृत्तीला बळी न पडता सामाजिक परिवर्तनासाठी भाजप आणि संघपरिवाराला पराभूत करण्याची गरज आहे. उच्च वर्गीय मध्यमवर्गीय, शिक्षीत, विचारी, अभ्यासू हा मोठा समाज असून त्यांना या पुढे येणाऱ्या एकाधिकारशाहीचा धोका लक्षात घेऊन मतदानाला सामोरे जावे लागेल. हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरी श्रद्धांजली ठरेल.

## निवृत्त कर्मचारी समन्वय समितीच्यावतीने येथील पालिका चौकात एक दिवसीय लाक्षणिक उपोषण



**कुरुंदवाड :** पालिकेच्या निवृत्त कर्मचार्यांना सातवा वेतन फरक, महागाई भत्ता याबरोबरच पेन्शन वेळेवर मिळावा या मागणीसाठी निवृत्त कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने येथील पालिका चौकात एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. कर्मचारी युनियन अध्यक्ष ए. बी. पाटील यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले.

पालिका कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन दोन दोन महिने प्रलंबित ठेवले जाते. निवृत्तीनंतर मिळाणारे वेतन कौटुंबिक खर्च आणि औषधोपचारासाठी अत्यावश्यक ठरत असते. मात्र पेन्शन वेळेवर मिळत नसल्याने वृद्धापकाळी आर्थिक हाल होत असून वेळेवर पेन्शन व्हावा तसेच सातवा वेतन आयोग फरक, महागाई भत्ता मिळावा अशी मागणी निवेदनात केली आहे.

उपोषणाला आप्पासो शेडबाळे, विलास शिरढोणे, देवल कडाळे, मुकेश डकरे, आप्पासो मधाळे, चंद्रकांत लाड, नामदेव धातुंडे, आनंदा माळी, पुष्पा ढाले, विमल कांबळे, शालन मधाळे सुरेश चाचणी आदी बसले होते. दरम्यान शिवसेना उबा ठा गटाचे शहर प्रमुख बाबासाहेब सागावे माजी उपनगराध्यक्ष दयानंद मालवेकर आप्पासो बंडगर यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन धना पाठिंबा देऊन मुख्याधिकारी आशिष चव्हाण यांच्याबरोबर चर्चा केली यावेळी बोलताना मुख्याधिकारी म्हणाले गेल्या शुक्रवारी निवृत्ती वेतन बाबत धनादेश बँकांकडे जमा केला आहे लवकरच आपल्या खात्यावर जमा होईल.

## खासदार डॉ. अमोल कोल्हे हे एक सुसंस्कृत लोकप्रतिनिधी – सुप्रिया सुळे

**पुणे :** शिरुर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा दोन दिवसांपूर्वी पार पडला. या मेळाव्यात अजित पवार म्हणाले की, तुम्हाला कार्यसम्राट खासदार पाहिजे की, नटसम्राट खासदार? असे म्हणत त्यांनी खासदार अमोल कोल्हे यांना टोला लगावला होता. यावर अमोल कोल्हे यांनी ट्विटद्वारे प्रतिक्रिया दिली असून यावर सुप्रिया सुळे यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे.

अजित पवार यांच्या टीकेला प्रतिक्रिया देत अमोल कोल्हे यांनी ट्विटर करत उत्तर दिले. कार्यसम्राट की नटसम्राट माहीत नाही, पण स्वकर्तृत्वसम्राट नक्की! असं ट्विट करत माझ्या काकांच्या पुण्याईवर मी डॉक्टर, अभिनेता नाही तर स्वकर्तृत्वावर मी माझी ओळख असल्याचे सांगत अमोल कोल्हे यांनी अजित पवार पवार यांना सुनावले होते. त्यावर सुप्रिया सुळे यांनी देखील विधान केले. सुप्रिया सुळे म्हणाल्या, हे दुर्दैव आहे. अमोल कोल्हे हे एक अतिशय सुसंस्कृत लोकप्रतिनिधी आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात



**राजगुरूनगर (वा.) :** राजगुरुनगर (ता. खेड) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त रविवार (दि.१४) रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, चाकण आयोजित परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ कामगार कल्याण केंद्र चाकण यांचे वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष भरत उढाणे, कामगार कल्याण मंडळ चाकण कार्यालयाचे अधिकारी अविनाश राऊत, गुणवंत कामगार रामदास सैंदाणे, शंकर नाणेकर, राजगुरुनगर कामगार कृती समितीचे अध्यक्ष सदाशिव अमराळे, दत्तात्रय दगडे उपस्थित होते. परिसंवाद कार्यक्रमामध्ये डव्होकेट करण कांबळे यांनी उपस्थितांना बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार व मजुरांच्या फायद्यासाठी केलेले कायदे, किमान वेतन, स्त्रियांना अधिकारासाठी हिंदू कोड बिल व महिलांना मतदानाचा अधिकार तसेच संविधानामुळे सर्वांना मिळालेले समान अधिकार याबाबत माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात भरत उढाणे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार वर्गासाठी केलेले कार्य या विषयी माहिती देऊन बाबासाहेबांचे विचार अंमलात आणावेत हीच खरी बाबासाहेबांना आदरांजली ठरेल असे सांगितले. यावेळी राकेश भारंबे व महेंद्र थोरात यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अविनाश राऊत यांनी व आभार रामदास सैंदाणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजगुरुनगर कामगार कृती समितीचे दत्तात्रय दगडे, प्रकाश पटारे, गोकुळ भामरे, कमलेश गावडे, सदाशिव आमराळे, किशोर केदारे, बाबासाहेब ढोकचौळे, पंकज शिंदे, ज्ञानेश्वर दवंगे, नागेश दळवी, शशिकांत खलाणे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.



## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**कोल्हापूर :** हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उमेदवार माजी खासदार राजू शेट्टी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला यावेळी स्वाभिमानी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुद्धा जोरदार शक्ती प्रदर्शन करून आपली ताकद दाखवून दिली.

हातकणंगणी मतदारसंघातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने महायुतीच्या उमेदवारासमोर आपले आव्हान उभे केले आहेत आज दसरा चौकात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे हजारो कार्यकर्ते माजी खासदार राजू शेट्टी यांचा अर्ज भरण्यासाठी दाखल झाले होते यावेळी हातात ऊस, स्वाभिमानीचा भव्य झेंडा राजू शेट्टी यांचे कट आउट घेऊन कार्यकर्ते आले होते दसरा चौकातून भव्यशक्ती प्रदर्शन करत बैलगाडीतून हजारो लोकांच्या रॅलीने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात

शेट्टींनी 'या' पाच जणांना सोबत नेले. आणि आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी शेट्टी म्हणाले खोक्यांचा बाजार करणारी शक्ती माझ्या विरोधात असून सामान्य शेतकरी माझ्या पाठीशी असल्याने एक नोट ,एक वोट या पद्धतीने निवडणुकीच्या रिंगणात उतरले असल्याने निश्चित विजयाची खात्री त्यांनी यावेळी दिली . यावेळी शेतकरी संघटनेने विराट शक्तीचे प्रदर्शन यावेळी घडवून आणले.

## महसूल जमा करण्याचे उद्दिष्ट गाठण्यामध्ये शिरोळ दुय्यम निबंधक कार्यालय अपयशी

### आर्थिक वर्षात ४१ कोटीचे उद्दिष्ट मात्र २८ कोटीचा महसूल जमा

**शिरोळ :** मार्च २०२३ ते मार्च २०२४ या कालावधीत शिरोळ येथील दुय्यम निबंधक कार्यालयातून २८ कोटीचा महसूल जमा झाला या आर्थिक वर्षात शासनाकडून ४१ कोटी रुपये महसूल गाठण्याचे उद्दिष्ट असताना २८ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे सुमारे १३ कोटी रुपये महसूल जमा करण्यात येतील कार्यालय अपयशी ठरले आहे यामुळे या कार्यालयातील कामकाजाविषयी वरिष्ठ कार्यालयातून तीव्र स्वरूपात नाराजी व्यक्त होत आहे

सन २०२२ सन २०२३ या वर्षात येथील प्रभारी अधिकाऱ्यांनी शासनाने दिलेल्या उद्दिष्टापेक्षा सुमारे ७ कोटी रुपयांचा अधिक महसूल जमा करून या कार्यालयाचा नवलौकिक वाढवला होता या वर्षात१७ कोटीचे उद्दिष्ट असताना येथील अधिकारी कर्मचाऱ्यांनी २४ कोटी रुपयांचा महसूल जमा केला होता उद्दिष्टापेक्षा ७ कोटी रुपयांचा अधिक महसूल जमा केल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वरिष्ठ कार्यालयातून कौतुक झाले

शासनाने मार्च २०२३ ते मार्च २०२४ या वर्षात ४१ कोटी रुपयाचे महसूल जमा करण्याचे उद्दिष्ट दुय्यम निबंधक कार्यालयास दिले होते मात्र यावर्षी केवळ २८ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे येथील कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उद्दिष्ट गाठण्यात अपयशी ठरले आहेत यामुळे शासनाचा १३ कोटी रुपयाचा महसूल बुडला आहे अशी चर्चा तालुक्यात जोर धरत आहे.

यावर्षी कोणतीही कर वाढ झाली नसली तरीही मोठ्या प्रमाणात खरेदी विक्रीचे दस्त नोंदणी झाली होते यामुळे दिलेले उद्दिष्ट गाठणे सहज शक्य होते पण कायद्याची पळवाट काढून जमिनीचे मूल्यांकन कमी दाखवून शासनाला मिळणारी स्टॅम्प ड्युटी नोंदणी फी यात मोठ्या प्रमाणात कपात झाली यामुळे आवश्यक असणारा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा झाला नाही केवळ आपला आर्थिक स्वार्थ साधण्यासाठी मुद्रांकलेखनिक व संबंधित अधिकाऱ्यांनी अनेक जमिनीचे मूल्यांकन कमी दाखवून दस्त नोंदवले याचा फटका महसूल जमा करण्यात झाला.

मूल्यांकन कमी करून नोंदणी झालेल्या दस्तांची वरिष्ठ स्तरावर चौकशी करून पुन्हा एकदा जमिनीचे योग्य मूल्यांकन करून खरेदी विक्रीसाठी लागणारे स्टॅम्प ड्युटी नोंदणी फी कमी असेल तर ती तात्काळ पुन्हा संबंधित पक्षकारांकडून भरून घेऊन शासनाचा महसूल वाढवावा तसेच दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी तालुक्यातील जनतेतून होत आहे

शिरोळ दुय्यम निबंधक कार्यालय जास्तीत जास्त महसूल जमा करणारे कार्यालय म्हणून ओळखले जाते या कार्यालयातील सर्व दस्तांची नोंदणी शासनाच्या नियमास अधीन राहून झाली असतील तर अपेक्षित असणारा महसूल जमा झाला असता पण कायद्याची पळवाट काढून नोंदणी केलेल्या दस्तामुळे यावर्षी उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सुमारे १३ कोटी रुपयांची महसूल तफावत राहिली आहे यामुळे या कार्यालयातील कामकाजाविषयी वरिष्ठ कार्यालयातून तीव्र स्वरूपात नाराजी व्यक्त केली जात असल्याचे बोलले जात आहे.

## जालन्यात पुन्हा दानवे विरुद्ध काळे सामना रंगणार

**जालना :** जालना लोकसभा मतदारसंघातील निवडणूक विकासाच्या मुद्यावर लढणार असल्याचे भाजपचे उमेदवार रावसाहेब दानवे यांनी स्पष्ट केले आहे. तर काँग्रेसचे उमेदवार कल्याण काळे यांनी दानवे आणि भाजपने केलेल्या मतदारसंघाच्या विकासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून ही निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्तीची असणार असल्याचे म्हटले आहे.

जालना लोकसभा मतदारसंघात गेल्या नऊपैकी आठ निवडणुकांत भाजपचा विजय झालेला आहे. त्यातही मागील सलग सात निवडणुका भाजपने जिंकलेल्या असून त्यापैकी सलग पाच वेळेस रावसाहेब दानवे निवडून आले. यापूर्वीही मतदारसंघांची पुनर्रचना झाल्यावर पहिल्यांदा झालेल्या लोकसभा निवडणुकीत दानवे आणि काळे यांच्यात लढत झाली होती. त्यावेळी झालेल्या अटीतटीच्या लढतीत काळे यांचा जवळपास साडेआठ हजार मतांनी पराभव झाला होता. आता दानवे आणि काळे यांच्यात पुन्हा लढत होणार असल्याने या निवडणुकीची आठवण महाविकास आघाडीतील कार्यकर्ते काढीत असून २०२४ मधील निवडणूक दानवे यांना सोपी नसल्याचे आवर्जून सांगत आहेत.

दानवे यांची उमेदवारी भाजपकडून १३ मार्च रोजी जाहीर झाली आणि त्यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते कामाला लागले. महाविकास आघाडीच्या उमेदवारीचा घोळ मात्र चालूच राहिला. महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे काळे यांनाच उमेदवारी मिळणार हे निश्चित मानले जात होते. परंतु दानवे यांची उमेदवारी जाहीर झाल्यावर चार आठवड्यांनी म्हणजे १० एप्रिल रोजी काळे यांची उमेदवारी काँग्रेस पक्षाने जाहीर केली. दरम्यानच्या काळात काळे यांनी मतदारसंघात अनेकांच्या भेटी-गाठी घेतल्या. परंतु त्यामध्ये सावधपणा होता, आता एकदा पक्षाने उमेदवारी जाहीर केल्यानंतर मात्र काळे यांनी प्रचाराच्या दृष्टीने लगेच पावले उचलली आहेत.

दानवे यांनी मतदार आणि कार्यकर्त्यांवर विश्वास व्यक्त करून विजयाचा षटकार मारण्याच्या संदर्भात आत्मविश्वास व्यक्त केला आहे. मतदारसंघातील विकास कामे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासविषयक दृष्टिकोनावर आपला प्रचार असेल, याकडे त्यांनी मतदारांचे लक्ष वेधले आहे. दानवे यांनी म्हटले आहे की, दोनदा विधानसभेवर आणि त्यानंतर सलग पाच वेळेस आपण लोकसभेवर निवडून आलेलो आहोत. एखादी निवडणूक जेव्हा आपण जिंकतो त्यावेळीच पुढील निवडणुकीची तयारी सुरू करतो. जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जनतेला आपल्या विकासविषयक कामांची माहिती आहे. आपण कुणाही उमेदवारावर वैयक्तिक टीका करणार नाही. जर कुणी आपल्यावर टीका आणि आरोप कले तर त्याचा प्रतिवाद करण्यास तसेच उत्तर देण्यास आपले कार्यकर्ते सक्षम आहेत. दोन जिल्ह्यांतील प्रत्येकी तीन विधानसभा मतदारसंघातील जनतेला आपले बोलणे, वागणे आणि विकासाचा दृष्टिकोन माहीत आहे.

२००९ मध्ये कल्याण काळे यांनी दिलेल्या अटीतटीच्या लढतीचा संदर्भ निघताच दानवे म्हणतात, २००९ आणि २०२४ च्या निवडणुकीत पंधरा वर्षांचा कालावधी लोटला आहे. या कालावधीत देश बदलला, नवीन कार्यकर्ते आले आणि देशात नवीन विकासाभिमुख नेतृत्त्व आले आहे. २००९ आणि २०२४ च्या निवडणुकांमध्ये जालना मतदारसंघाची तुलना करता येणार नाही.


आपली लढाई व्यक्तीशी नसून विचारांशी आहे आणि पंतप्रधान मोदी यांचे विचार हेच आपले विचार आहेत. गरीब, शेतकरी, युवा, महिला यासह सर्वांना न्याय देण्याचे काम मोदींनी केलेले आहे. कार्यकर्त्यांचा आणि आपला एकमेकांवर, मोदींच्या विचारावर व जनतेवर आमचा विश्वास आहे. कार्यकर्त्यांचे आमचे नेटवर्क मजबूत आहे.

काँग्रेसचे उमेदवार कल्याण काळे महाविकास आघाडीतील इतर दोन घटक पक्षांच्या मदतीने दानवे यांच्याशी दोन हात करण्यासाठी मैदानात उतरणार आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# राजकीय जाहिरातींच्या 'बल्क एसएमएस'चे पूर्व प्रमाणीकरण आवश्यक : जिल्हाधिकारी डॉ. दिवसे

## खासगी एफ.एम. वाहिन्यांनीही जाहिरात प्रसारणापूर्वी प्रमाणीकरण झाल्याची खात्री करावी



**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** निवडणूक प्रचारासाठी उपयोगात आणले जाणारे बल्क एसएमएस, रेकॉर्डेड व्हाईस मेसेजेस यांना जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एमसीएमसी) प्रमाणीकरण करुन घेणे बंधनकारक आहे. तसेच रेडिओ आणि खासगी एफएम वाहिन्यांसाठीही या तरतुदी लागू असून जाहिरात प्रसारण करण्यापूर्वी या बाबींचा खात्री करुन घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात दूरसंचार सेवा देणाऱ्या कंपन्याचे प्रतिनिधी, कम्युनिटी रेडिओ व एफएम चॅनेल्सच्या प्रतिनिधींसोबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर, जिल्हा दळणवळण आराखड्याच्या समन्वय अधिकारी शमा पवार आदी उपस्थित होते.

डॉ. दिवसे म्हणाले, जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता लागू असून निवडणूक प्रचारासाठी राजकीय पक्ष, उमेदवार तसेच त्रयस्थ व्यक्तींकडून विविध माध्यमांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असतो. निवडणूक प्रचाराच्या जाहिराती दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल वाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हाईस मेसेजेस तसेच सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळावरुन प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीकडून प्रमाणीत करुन घेणे आवश्यक आहे.

निवडणूक प्रचाराचं संनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात माध्यम कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. या कक्षाचे सर्व माध्यमातून होत असलेल्या निवडणूक प्रचारावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. पूर्वप्रमाणिकरण न करता बल्क एसएमएस पाठविले जात असल्याचे किंवा कोणत्याही इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे जाहिरात प्रसारित होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

आचारसंहितेच्या काळात निवडणूक प्रक्रियेला बाधा येईल अशा प्रकारची कोणतीही पोस्ट नागरिकांनी समाजमाध्यमांवरुन करू नये. निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. उमेदवारांच्या राजकीय जाहिरातींच्या प्रमाणीकरणासाठी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीशी (एमसीएमसी) जिल्हा माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, ससून सर्वोपचार रुग्णालयासमोर, पुणे ४११००१ दूरध्वनी क्र. ०२०-२६१२१३०७, ई-मेल diopune@gmail.com या पत्त्यावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# भाजपचे संकल्पपत्र विकसित भारताचा 'रोड मॅप' : माधव भांडारी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने प्रसिद्ध केलेले संकल्प पत्र विकसित भारताचा रोड मॅप असल्याचे मत भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी आज पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, पश्चिम महाराष्ट्र माध्यम प्रमुख अमोल कविटकर, हेमंत लेले, पुष्कर तुळजापूरकर यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

भांडारी म्हणाले, 'जनतेच्या सहभागातून जनतेच्या आशा आकांक्षांना आकार देणारे हे संकल्प पत्र आहे. या संकल्पपत्रात दहा वर्षांतील पूर्वीच्या जाहीरनाम्यातील पूर्तता झालेल्या विकासकामे आणि योजनांचा आढावा घेतला आहे. अशी भूमिका या आधी कोणत्याही राजकीय पक्षाने मांडली नाही. दरवेळी फक्त नवीन जाहीरनामा प्रसिद्ध केला.'

भांडारी पुढे म्हणाले, '२०४७ पर्यंत एक संपन्न, समर्थ राष्ट्र म्हणून उभे राहण्याचा संकल्प करण्यात आला आहे. युवक, महिला, शेतकरी अशा सर्व समाज घटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी संकल्प पत्रात समावेश करण्यात आला आहे. रोजगार निर्मितीसाठी पायाभूत सुविधांवर भर देण्यात आला आहे.'

समान नागरी कायदा लवकरात लवकर लागू व्हावा ही भारतीय जनता पार्टीची भूमिका आहे. जोपर्यंत हा कायदा येत नाही तोपर्यंत महिलांना समान हक्क मिळणार नाहीत असेही भांडारी म्हणाले.

# पुण्यात मनसेच्या मतांचा फायदा कोणाला?






**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विनाशर्थ पाठिंबा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिला. त्यानंतर आता या पक्षाची मते कोणाला मिळणार याकडे लक्ष लागले आहे. महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी मनसेच्या मातांमुळे फायदा होणार असल्याचे सांगितले आहे. पण, पूर्वाश्रमीचे मनसेचे नगरसेवक असलेल्या रवींद्र धंगेकर आणि वसंत मोरे यांनाही ही मते मिळणार असल्याची कुजबुज सुरू आहे.

कोणत्याही परिस्थितीत पुणे लोकसभा निवडणूक एकतर्फी होऊ देणार नसल्याचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार वसंत मोरे यांनी निक्षून सांगितले आहे. राज यांच्या सोबत २५ वर्षे काम केल्याने लवकरच त्यांची भेट घेणार असल्याचेही मोरे यांनी स्पष्ट केले. २०१२ मध्ये मनसेचे तब्बल २७ नगरसेवक निवडून आले होते. कै. रमेश वांजळे यांच्या रूपाने खडकवासला मतदारसंघात मनसेचा आमदारही निवडून आला होता. २०१७ मध्ये मनसेचे केवळ २ नगरसेवक निवडून आले होते. भाजपचे तब्बल ९८ नगरसेवक निवडून आले होते. मनसेची पुणे शहरात मोठी ताकद आहे.

सध्या मुरलीधर मोहोळ, वसंत मोरे आणि रवींद्र धंगेकर यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. या तिन्ही उमेदवारांच्या प्रचाराला पुणेकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. राज यांनी महायुतीचा प्रचार करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे मोहोळ यांना त्याचा फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे.

## पान १ वरून

### आमचे साताऱ्यातील नाणे खणखणीत...

महाराष्ट्रातील ४८ जागा एकजूटपणाने लढवत आहे. त्यापैकी दोन तृतीयांश जागा इंडिया आघाडीला मिळाल्यास आश्चर्य वाटायला नको. साताऱ्यात सुद्धा आमचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यावर घोटाळ्यांचा आरोप करणाऱ्यांना आम्ही चोख उत्तर देणार आहोत. आमचे नाणे खणखणीत आहे. सातारा पुरोगामी विचारांचा असून येथे परिवर्तन घडणारच, असा ठाम विश्वास राष्ट्रवादी सुप्रिमो शरद पवार यांनी व्यक्त केला.

शरद पवार म्हणाले, इंडिया आघाडीचे एक सूत्र आहे. महाराष्ट्रातील ४८ जागा एकजूटपणाने लढून त्या मिळवण्याच्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरू आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे शरद पवारांनी महाराष्ट्रासाठी दहा वर्षात काय केले, असे सांगतात. मात्र, गेल्या दहा वर्षात त्यांचीच सत्ता होती. त्यामुळे त्यांनीच सांगावे, त्यांनी काय केले? २००४ ते २०१४ या काळात पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्याबरोबर मी महाराष्ट्रासाठी काय केले, हे मात्र निश्चित सांगू शकतो.

अजितदादा गटाच्या बारामतीचे उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यासंदर्भात 'घरातले' आणि 'बाहेरचे' असे वक्तव्य शरद पवारांनी केल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. यासंदर्भात नक्की काय विधान केले, असा प्रश्न पवारांना विचारला असता, ते म्हणाले की, माझ्या या विधानाचा गैरअर्थ लावला जात आहे. आधी बारामतीत मी लढलो, नंतर अजित पवार लढले, त्यानंतर सुप्रिया सुळे लढल्या, आता ते सुनेत्रा पवारांसाठी मत मागत आहेत, यासंदर्भाने मी बोललो होतो. त्यात कोणाचाही अवमान करण्याचा हेतू नाही. महिला सन्मान आणि महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असताना घेतले होते. त्यामुळे गैरअर्थ काढणाऱ्यांविषयी मी बोलू शकत नाही.

महाराष्ट्रामध्ये ४८ पैकी महाविकास आघाडीच्या दोन तृतीयांश जागा निवडून येतील. महाराष्ट्रात परिवर्तनाची लाट आहे, आम्ही महाराष्ट्रात जिथे दौरा करतो तेथे मतदारराजा आम्हाला प्रतिसाद देत आहे. त्यामुळे आम्हाला खात्री आहे की, महाराष्ट्रात परिवर्तन घडणार! तसेच सातारा जिल्ह्यातही आम्ही आमदार शशिकांत शिंदे हा उमेदवार दिला आहे. आज उमेदवारी अर्ज भरताना झालेले शक्तिप्रदर्शन ही परिवर्तनाची सुरूवात आहे. पुरोगामी विचारांचा सातारा जिल्हा नेहमीच परिवर्तनाला बळ देतो, जे चांगलं आहे, त्यालाच प्राधान्य देतो. शशिकांत शिंदे हे आमचे नाणे खणखणीत आहे. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भात दाखल आरोप करणारे नेमके आत्ताच आरोप का करतात, हे समजत नाही. मात्र, आमचे उमेदवार त्याला पत्रकार परिषद घेऊन स्वतंत्र उत्तर देतील, असे पवार म्हणाले.

### 'इन्स्टाग्राम'च्या स्टेटसवरून पिस्तुलाची...

सागर भिंगारदिवे (रा. तांदुळवाडी, ता. बारामती) याच्याकडून दोन महिन्यांपूर्वी विकत घेतल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस पथकाने सागर भिंगारदिवे याच्याकडे चौकशी केल्यानंतर ते ओंकार महाडीक (रा. बारामती) याच्याकडून घेतल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी ही साखळी जोडली असून आता ओंकार महाडीक याचा शोध पोलिस घेत आहेत. आकाश शेंडे, रोहित वणवे व सागर भिंगारदिवे यांना अटक केली असून आणखी यात किती जण सहभागी आहेत, याचा तपास सुरू असल्याची माहिती सहायक पोलिस निरिक्षक राहुल घुगे यांनी दिली.

### सांगलीत विशाल पाटील यांनी अपक्ष...

शिवसेना ठाकरे गटाला सोडली. मात्र यामुळे काँग्रेसचे इच्छुक उमेदवार विशाल पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. विश्वजित कदम यांनी तर पत्रकार परिषद घेऊन ठाकरे गटाने उमेदवारी मागे घ्यावी व काँग्रेसच्या वरिष्ठांनी आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी देखील केली. पण त्यानंतर काहीही निर्णय न झाल्याने अखेर नाराज झालेले विशाल पाटील यांनी सांगली लोकसभेसाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

# नवमतदारांनी भारताच्या विकासाचे भागिदार व्हावे - मुरलीधर मोहोळ

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** विश्वगुरू नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी आणि भारताला जगातील तिसरी आर्थिक महासत्ता करण्यासाठी नवमतदारांनी महायुतीला मतदान करावे, असे आवाहन महायुतीचे पुणे लोकसभेचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांनी केले. परशुराम सेवा संघाच्या वतीने आयोजित युवा ब्राह्मण मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी भाजपा शहराध्यक्ष धीरज घाटे, परशुराम सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष विश्वजित देशपांडे, उपाध्यक्ष अपर्णाताई वैद्य, महायुतीचे समन्वयक आणि भाजपाचे प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर, प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, लोकसभा प्रभारी श्रीनाथ भीमाले, शहर उपाध्यक्ष शाम देशपांडे इ मान्यवर उपस्थित होते.



तुम्ही पहिल्यांदाच मतदान करणार असल्यामुळे तुम्हाला शुभेच्छा आणि त्याचे तुम्हाला औत्सुक्य आहेच पण त्याच बरोबर भारताच्या विकासाचे भागीदार आणि साक्षीदार होण्याची संधी तुम्हाला मिळणार आहे असेही मुरलीधर मोहोळ म्हणाले. या निवडणुकीत मोदीजीच विजयी होणार याची इतर देशांना देखील खात्री आहे कारण आत्ताच अनेक राष्ट्रप्रमुखांनी निवडणुकीनंतर त्यांच्या देशाला मोदींनी भेट द्यावी यासाठी आत्ताच निमंत्रण पाठविले आहे, असेही ते म्हणाले. तसेच पुणे शहराच्या विकासात माझे योगदान असेल आणि तुमच्या स्वप्नातील पुणे उभारण्यासाठी मी सर्वतोपरी कार्य करेन असे ही मोहोळ म्हणाले.

आज येथे एकत्र आलेले शंभर पेक्षा जास्त ब्राह्मण युवा वर्ग जास्तीतजास्त मतदारांपर्यंत पोहोचेल आणि पुण्यात भाजपा ला मतदान व्हावे यासाठी मतदार जागृती करेल असे परशुराम सेवा संघाचे अध्यक्ष विश्वजित देशपांडे यांनी स्पष्ट केले.

भारत तिसरी आर्थिक महासत्ता होण्याच्या दृष्टीने वेगाने वाटचाल करत असून यासाठी नरेंद्रभाई मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचा संकल्प नवमतदारांनी करावा, कारण देशाच्या विकासात अडथळे आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत असे महायुती चे समन्वयक संदीप खर्डेकर म्हणाले. युवकांच्या स्वप्नातील राष्ट्र निर्माणाचे कार्य सुरु असून पंतप्रधान मोदी यांनी स्टार्ट अप च्या माध्यमातून तुमच्या कल्पनाशक्तीतून जे अभिनव प्रॉडक्ट बनविण्यात येत आहेत त्याला देशांतर्गतच प्रचंड वाव आणि बाजारपेठ उपलब्ध केली आहे असे ही संदीप खर्डेकर म्हणाले.

शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी केंद्र व राज्य सरकारच्या लोकाभिमुख योजनांची माहिती देताना "तुमचे भविष्य उज्ज्वल व्हावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी वीस वीस तास काम करत आहेत, त्यांचे हात बळकट करून राष्ट्रनिर्मिती च्या कार्यात सहभाग नोंदविण्यासाठी पहिले मतदान मोदींना करा असे आवाहन देखील धीरज घाटे यांनी केले.

माधव भांडारी यांनी देखील युवा वर्गाशी संवाद साधला.

कार्यक्रमाचे संयोजन आणि प्रास्ताविक विश्वजित देशपांडे यांनी केले तर अपर्णा वैद्य यांनी आभार मानले.




# मिरवणुकीद्वारे 'आझम कॅम्पस'चे महामानवाला अभिवादन!

■ **विद्यार्थ्यांकडून सामाजिक, शैक्षणिक संदेशाचा प्रसार**

**राजदंड / पुणे**

'महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी' (आझम कॅम्पस)च्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तसेच डॉ. पी.ए.इनामदार युनिव्हर्सिटीचे कुलपती डॉ. पी.ए.इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी साडे नऊ वाजता साधू वासवानी चौकातून या मिरवणुकीला प्रारंभ झाला.जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

संस्थेचे सचिव प्रा .इरफान शेख ,डॉ.पी.ए.इनामदार युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ.एम.डी.लॉरेन्स, शाहिद इनामदार, एस ए इनामदार, शाबिर शेख, रशीद चीनिवार, वाहिद बियाबानी, आसिफ शेख, बबलू सय्यद, युसूफ शेख, विश्वस्त, मुख्याध्यापक , प्राचार्य ,पदाधिकारी, कर्मचारी आणि २ हजार विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले.अल्पसंख्य समुदायातील विद्यार्थिनींचे प्रमाण लक्षणीय होते.ठिकठिकाणी सामाजिक कार्यकर्त्यांनी या अभिवादन मिरवणुकीचे स्वागत केले.

दरवर्षी महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीतर्फे छत्रपती शिवाजी महाराज, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महंमद पैगंबर यांना अभिवादन करण्यासाठी भव्य मिरवणुका काढल्या जातात. हजारो विद्यार्थी त्यात सहभागी होतात.त्यातून महामानवांचे सामाजिक ,शैक्षणिक संदेशांचा प्रसार केला जातो.

# 'संविधान आधारीत देशाची वाटचाल' हीच बाबासाहेबांना आदरांजली - गोपाळ तिवारी

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** स्वातंत्रोतर भारतात, प्रजा समजल्या जाणाऱ्या जनतेस समान मताचा अधिकार अर्पण करीत नागरीक बनवणारे स्वतंत्र भारताचे 'संविधान' हीच् खरी भारताची ओळख असून, संविधानाचे मुल्य जपले तरच श्रेष्ठ भारत, नवा भारत, आत्मनिर्भर भारत होऊ शकतो अन्यथा केंद्रातील सत्तांधिशांच्या भारता विषयीच्या वल्गना व्यर्थ आहेत, असे प्रतिपादन कांग्रेस नेते व राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी केले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या वकील विभागातर्फे महामानव डॉ. आंबेडकरांचे प्रतिमेस काँग्रेस नेते गोपाळ तिवारी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी ॲड. फैयाज शेख यांनी स्वागत - प्रास्ताविक केले. ॲड. शहीद अख्तर यांनी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी ॲड. श्रीकांत पाटील, ॲड राजेंद्र काळेबेरे, ऍड. अतुल गुंड पाटील, ऍड. सुरेश देवकर, ऍड. विद्या पेळपकर, ऍड. अंजु डिसूझा, सुरेश नांगरे, ॲड. बाळासाहेब बामणे, ऍड. वैभव कांबळे,राजू साठे, राजेश सुतार इत्यादी उपस्थित होते.आभार प्रदर्शन ऍड. विजय तिकोने यांनी केले.



ते पुढे म्हणाले की, राजे शाही / निजाम शाहीत' विभागलेल्या खंडप्राय भारतास, ब्रिटीशांच्या गुलामगिरीच्या जोखडातुन, अहिंसेच्या व मुत्सदेगिरीच्या मार्गाने सोडवण्याचे महतपुर्ण कार्य महात्मा गांधी, नेहरू, पटेल, आझाद, बोस आदिंनी केले.

भगतसिंह - राजगुरूंसह हजारो स्वातंत्र्य विरांच्या बलीदानामुळे व अविरत संघर्षामुळे देशास स्वातंत्र्य मिळाले ही वास्तवता आहे.

तर डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळे संघराज्य प्रणीत स्वंतत्र व प्रजासत्ताक भारताची ओळख जगासमोर निर्माण झाली हे वास्तव आहे.

त्यामुळे 'भारतिय संविधान प्रती जागरूक रहाणे व संविधानाचे अर्थात् भारतिय राज्य-घटनेचे संरक्षण करणे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. त्यामुळेच लोकशाहीरुपी भारताची संविधान आधारीत वाटचाल हीच खऱ्या अर्थाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली ठरेल असे वक्तव्य या प्रसंगी काँग्रेस राज्य प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी केले.

# ९५ टक्के मतदारांचा 'ईव्हीएम'वर विश्वास नाही : बहुजनांना न्याय मिळण्यासाठी 'परिवर्तन'चा सर्व्हे

**राजदंड / पुणे**

लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बहुजन समाजाच्या प्रवर्गातील स्वयंप्रेरित सामाजिक कार्यकर्त्यांच्या परिवर्तन संघटनेने बहुजन समाजांच्या गंभीर समस्यांचे निराकरण करण्याच्या उद्देशाने नुकताच ऑनलाइन सर्वे केला. हा सर्वे नुसार ९५ टक्के मतदातांना ईव्हीएमवर विश्वास नाही. निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूकीसाठी पारंपारिक मतपत्रिका निवडण्याची इच्छा व्यक्त केली आहे. तसेच बहुजन समाज पार्टी (बसपा), वंचित बहुजन आघाडी (वीबीए), आणि भारतीय रिपब्लिकन पक्ष(भारिप) यांना अचूक रणनिती आखण्यास हा सर्वे उपयुक्त ठरू शकेल. अशी माहिती ॲड. अरूण कुमार डोळस, इनक्राफ्ट टेक्नॉलॉजीज प्रा.लि.चे पंकज जाधव व दत्तात्रय गोरखे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

ॲड. अरूण कुमार डोळस यांनी सांगितले की, सर्वेनुसार सात प्रमुख निष्कर्ष काढण्यात आले आहेत. यानुसार युतीच्या रणनितीबाबतः

## बसपा, वीबीए व भारिप पक्षांना अचूक रणनिती आखण्यास ठरेल उपयुक्त

वीबीए, बसपा आणि भारिप (आ) पक्षांनी इंडिया गटाबरोबर युती करावी. सर्वेनुसार ६३ टक्यांना वाटते की, वीबीए आणि इंडिया गटात युती व्हावी. ६२ टक्के सहभागीदारांना बसपा आणि भारत यांच्यात युती अपेक्षित आहे. तर ५२ टक्के सहभागीदार भारिप (आ) आणि इंडिया गटात युतीची अपेक्षा करतात.

**बहुजन समाजाच्या मतदारांच्या पसंती बाबत :** ४९ टक्के (सर्वोच्च) सहभागीदारांनी सूचित केले की बहुजन समाजाचे प्रतिनिधत्व करणार्या राजकीय पक्षांची एनडीए किंवा इंडिया या दोन गटांपैकी एका बरोबर युती व्हावी. अन्यथा मतदान करताना वीबीए त्यांचा सर्वाधिक पसंतीचा पक्ष असेल. ३१ टक्के सहभागीदरांनी अशा परिस्थितीत मत देताना इंडिया गटाला पसंती दर्शवली. बहुजन समाजातील नागरिकांमध्ये वीबीएची वाढती लोकप्रियता तसेच राज्यात इंडिया व वीबीए मध्ये युतीची गरज दर्शवते.



**मतदान माध्यमाला प्राधान्य देण्याबाबत :** ९५ टक्के लोकांचा मतदानाचे साधन किंवा माध्यम ईव्हीएमवर विश्वास नाही. निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेसाठी ईव्हीएमपेक्षा पारंपारिक मतपत्रिका निवडण्याची इच्छा आहे.

**एकतेच्या निर्मितीतील अडथळ्यांविषयी :** ६१ टक्के सहभागीदारांना वाटते की महाराष्ट्रातील सध्याच्या परिस्थितीत वीबीए आणि बसपा एका पक्षात एकत्र येऊ शकतात. ५९ टक्के सहभागीदारांनी वीबीए व भारिप (आ) यांच्यात ऐक्य होण्याची इच्छा व्यक्त केली. ५४ टक्के सहभागीदाराना बसपा, वीबीए आणि भारिप (आ) हे तिन्ही प्रमुख पक्ष, सध्या एकत्रित येण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही. तर ६० टक्के सहभागीदारांना बसपा आणि भारिप (आ) यांच्यात ऐक्याची शक्यता दिसत नाही.

**एकतेच्या निर्मितीतील अडथळ्यांविषयी :** या सर्वेक्षणात नेत्यांचा अहंकार (२५ टक्के) स्वार्थ (२३ टक्के) आणि परस्पर विश्वासाचा अभावा (१५ टक्के) हे प्रमुख अडथळे दूर केले तर बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणार्या पक्षांच एकत्रीकरण शक्य आहे.

**बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय पक्षांमधील ऐक्याबाबत :** सर्वेतील ५५ टक्क्यांचा विश्वास आहे की बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारे सर्व राजकीय पक्ष त्यांच्यात ऐतिहासिक मतभेद आहेत. त्यांना एकत्रित करण्याचे भूतकाळातील प्रयत्न अयशस्वी होऊनही एकत्र येऊ शकतात. तरूण म्हणजे ३८ वर्षे वयापर्यंतच्या ६५ टक्के स्त्रिया आणि ६२ टक्के पुरूष एकजूट होण्याविषयी अधिक आशावादी आहेत. ७७ टक्क्यांना मोठ्या गटाला या पक्षांनी एकत्र येऊन एक मजबूत राजकीय पक्ष उभारावा अस वाटतं.

राजकीय पटला बाबतः यात असे दिसते की बहुजन समाज भारताच्या लोकसंख्येच्या ८० टक्के पेक्षा अधिक आहे. तरीही त्यांच्या मतांचे विविध राजकीय पक्षांमध्ये विभाजन होत असल्याने त्यांचे प्रतिनिधित्व करणारा कोणताही मोठा राजकीय पक्ष केंद्रात किंवा महाराष्ट्रात सरकार स्थापन करणार नाही.

**सर्वे संदर्भात विस्तृत माहिती :** बहुजन समाजाच्या एससी, एसटी आणि ओबीसी प्रवर्गातील स्वयंप्रेरित सामाजिक कार्यकर्त्यांच्या परिवर्तन या अनौपचारिक संघटनेने केलेला हा सर्वे आहे. १४ फेब्रुवारी ते २४ मार्च या कालावधित चाललेल्या सर्वेत बहुजन समाजातील १०२३ महाराष्ट्रीयन व्यक्तींनी प्रतिसाद दिला. या सर्वेत ५ विभागात ५० प्रश्न विचारण्यात आले. येणार्या निवडणुकीचे निकष लक्षात घेता युती, बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणार्या राजकीय पक्षांमधील एकता, ईव्हीएम, इत्यादींशी थेट संबंधित असलेल्या १४ प्रश्नांचे निष्कर्ष आहे.

# संवर्धन प्रक्रिया पूर्ण; अंबाबाई मूर्तीचे पूर्ववत दर्शन

**कोल्हापूर :** करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीच्या मूळ मूर्तीची गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेली संवर्धन प्रक्रिया सोमवारी पूर्ण झाली ... घेश्रहर्रीी: संवर्धन प्रक्रिया पूर्ण; अंबाबाई मूर्तीचे उद्यापासून पूर्ववत दर्शनकोल्हापूर: करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीच्या मूळ मूर्तीची गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेली संवर्धन प्रक्रिया सोमवारी पूर्ण झाली आहे. आज मंगळवारी अंबाबाईच्या मूळ मूर्तीवरील धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर सकाळी ११ नंतर



दर्शन सुरू होईल.

श्री अंबाबाई मूर्तीची मोठी झीज झाल्याने पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीच्यावतीने जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केंद्रीय पुरातत्व विभागाकडे मूर्तीच्या संवर्धन प्रक्रियेसाठी पाठपुरावा केला होता त्यानुसार शुक्रवार व शनिवारी औरंगाबाद पुरातत्व रसायनतज्ञ विभाग शाखेच्या अधिकाऱ्यांनी मूर्तीची पाहणी केली.

रविवारी व सोमवारी दोन दिवस संवर्धन प्रक्रिया करण्यात आली आहे. ही संवर्धन प्रक्रिया पुरातत्व रसायनतज्ञ विभागाचे उपअधिक्षक डॉ. एस. विनोद कुमार, वरिष्ठ प्रतिमाकार सुधीर वाघ, प्रतिमाकार मनोज सोनवणे यांनी पूर्ण केली आहे.

आज मंगळवारी पहाटे अंबाबाईची मूळ मूर्ती पुजाऱ्यांकडे सुपूर्द केली जाईल. त्यानंतर मूर्तीमध्ये प्राणप्रतिष्ठेचे धार्मिक विधी केले जातील. यासाठी सकाळचे अकरा वाजून जातील. त्यानंतर भाविकांना मूळ मूर्तीचे दर्शन घेता येईल.

# आरटीई ऑनलाइन प्रवेशास सुरुवात, राज्य शासनाला मुहूर्त मिळाला

**पुणे :** आरटीई पोर्टलवर तब्बल दीड महिने चार ते पाच वेळा मुदतवाढ देत शाळा नोंदणीसह रिक्त जागांची आकडेवारी अद्ययावत केल्यानंतर अखेर ऑनलाईन प्रवेश अर्जासाठी राज्य शासनाला मुहूर्त मिळाला आहे. आरटीई अंतर्गत रिक्त असलेल्या २५ टक्के आरक्षित जागांवर प्रवेश घेण्यासाठी पालकांना दि. १६ एप्रिल म्हणजेच आजपासून ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत.आरटीई पोर्टलवर शाळांची नोंदणी पार पडल्यानंतर आरटीई कायद्यांतर्गत दुर्बल, वंचित, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्ग घटकांकरिता २५ टक्के रिक्त जागांवर विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन माध्यमातून अर्ज करण्यास सुरूवात होते. मात्र, यंदा आरटीई प्रवेश प्रक्रियेला तब्बल दोन महिने उशिराने सुरूवात झाली आहे. त्यात दीड महिना केवळ शाळांची नोंदणी करण्यामध्ये गेला आहे. त्यामुळे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेंतर्गत अर्ज करण्यास केव्हा सुरूवात होणार? याची पालक मागील अनेक महिन्यापासून अतुरतेने वाट पाहत होते. राज्यात ७५ हजार ९७४ शाळांनी आरटीई पोर्टलवर नोंदणी केली आहे. या शाळांमध्ये आरटीई अंतर्गत २५ टक्के रीक्त असलेल्या ९ लाख ७२ हजार ८२३ जागा अद्ययावत केल्या आहेत. खाजगी शाळांसह शासकीय, अनुदानित शाळांचा समावेश आहे. पालकांना दि. १६ ते ३० एप्रिल या कालावधीत ऑनलाईन माध्यमातून अर्ज करता येणार आहे अशी माहिती प्राथमिकशिक्षणसंचालक शरद गोसावी यांनी दिली.पुणेजिल्ह्यांत ७८ हजार जागाआरटीई अंतर्गत प्रवेशासाठी पुणे जिल्ह्यांतील ५ हजार १५३ शाळा नोंदणी केली आहे. या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या ७७ हजार ९२७ जागा रीक्त आहेत. ऑनलाईन प्रवेश अर्ज कसा करावा?नियमावली, कागदपत्रे आदींबाबत आरटीई पोर्टलच्या https://student.maharashtra.gov.in/admšportal या संकेतस्थळावर अधिक माहिती देण्यात आली आहे.

# नाराज काँग्रेस नेते आबा बागुल फडणवीसांच्या भेटीला, भाजपमध्ये प्रवेश करण्याच्या चर्चांना उधाण

**नागपूर :** पुण्याचे माजी उपमहापौर आणि काँग्रेस नेते आबा बागुल नागपूरमध्ये फडणवीस आणि बावनकुळेंच्या भेटीला पोहोचले आहेत.आबा बागुल यांनी काँग्रेसने रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी दिल्यानंतर नाराजी व्यक्त केली होती. त्याचबरोबर पुण्यातील काँग्रेस पक्ष कार्यालयासमोर आंदोलन देखील केले होते. तेव्हापासून आबा बागुल भाजप नेत्यांच्या संपर्कात असल्याची चर्चा होती. त्यामुळे आता नागपुरात भाजप नेत्यांची भेट घेतल्यावर बागुल हे ऐन निवडणुकीच्या तोंडावर भाजपमध्ये प्रवेश करणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे. तसं झाल्यास त्याचा फटका धंगेकर यांना किती बसतो हे देखील पाहावं लागेल.

आबा बागुल यांनी रविंद्र धंगेकरांना उमेदवारी दिल्यानंतर जाहीर नाराजी व्यक्त केली होती. पुण्यातील काँग्रेसचे जे पक्ष कार्यालय आहे ज्याला काँग्रेस भवन म्हणून ओळखले जाते तिथे त्यांनी आंदोलन देखील केले होते.आपल्यावर अन्याय झाला अशी भावना व्यक्त केली होती. तेव्हापासून कदाचीत त्या आधीपासूनच आबा बागुल हे भाजप नेत्यांच्या संपर्कात होते. खासकरुन देवेंद्र फडणवीसांच्या संपर्कात असल्याची चर्चा होती. आज जी चर्चा प्रत्यक्षात उतरल्याचे चित्र आहे.

बागुलांच्या नाराजीचा किती फटका बसणार आहे?

आबा बागुल हे नागपुरात पोहचले आहे. त्यांना या बाबत विचारले असता आपण खासगी कामासाठी नागपुरला आल्याचे त्यांनी सांगितले. आर्थातच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही भेट होत आहे. त्यामुळे आता बागुल भाजपमध्ये पक्षप्रेवश करणार का? आणि जर आबा बागुल यांनी पक्ष प्रवेश केला तर काँग्रेसचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांना बागुलांच्या नाराजीचा किती फटका बसणार आहे? हे आगामी काळात पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

आबा बागुल हे काँग्रेस पक्षाकडून पाचवेळा नगरसेवक

काही दिवसापूर्वी बाळासाहेब थोरात यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्शवभूमीवर आढावा बैठक घेतली. या बैठकीला देखील आब बागुल गैरहजर होते.आबा बागुल हे लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक होते. पुण्यात ४० वर्षे काम केलेल्या पक्षातल्या निष्ठावंतांवर अन्याय झाला. निष्ठावंतांना न्याय नसेल, तर न्याय यात्रेचा उपयोग काय, असा सवाल काँग्रेसचे माजी उपमहापौर आबा बागुल यांनी केला होता. त्यामुळे आबा बागुल यांची नाराजी ही उघड आहे. आबा बागुल हे काँग्रेस पक्षाकडून पाचवेळा नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी प्रकाश आवाडेंचं बंड केलं थंड

**कोल्हापूर :**' गेल्या काही दिवसांपासून कोणत्याही परिस्थितीत हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार म्हणजे लढवणार आणि खासदार कसा असतो हे दाखवून देणार असे म्हणत शड्डू ठोकलेल्या अपक्ष आमदार प्रकाश आवाडे यांची तलवार मॅन करण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना यश आलं आहे. शनिवारी झालेल्या पहिल्या भेटीमध्ये प्रकाश आवाडे यांनी लढण्याचा निर्णय कायम ठेवल्यानंतर आज धैर्यशील मानेंचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कोल्हापुरात प्रकाश आवाडे यांच्या घरी पोहोचले.

प्रकाश आवाडेंकडून लढण्याची तलवार म्यान

प्रकाश आवाडे यांच्या घरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शंभूराज देसाई, रामदास कदम यांच्यासह पोहोचले. यावेळी प्रकाश आवाडे यांच्याशी चर्चा करत यांची मनधरणी केली. त्यामुळे आवाडे यांनी आपली तलवार म्यान केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रकाश आवाडे यांना सोबत घेऊनच मने यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निघाले. त्यामुळे एक प्रकारे मुख्यमंत्री शिंदे यांना हातकणंगले मतदारसंघांमध्ये



महायुतीमध्ये झालेली कोंडी फोडण्यात यश आलं आहे.

मुख्यमंत्री शिंदेंकडून कोल्हापूरच्या दोन्ही जागांवर लक्ष केंद्रित

जर प्रकाश आवाडे हातकणंगलेमधून उभे राहिले असते तर इचलकरंजीमधील मतविभागणीचा मोठा धोका होता. त्यामुळे महायुतीचे अधिकृत उमेदवार धैर्यशील माने यांना धोका होता. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या तीन दिवसांपासून कोल्हापूरच्या दोन्ही जागांवर विशेष लक्ष केंद्रित केलं आहे. शनिवारी संध्याकाळी त्यांनी कोल्हापूरचा दौरा करत रविवारी पहाटेपर्यत हातकलंगले लोकसभा मतदारसंघासाठी जोडण्या केल्या होत्या.

प्रकाश आवाडे यांच्या बंडखोरी मागे कोण?

शिरोळचे अपक्ष आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर, जनसुराज्य आमदार विनय कोरे यांच्या भेटीगाठी घेत गोकुळमध्ये सुद्धा त्यांनी फोनाफोनी केली होती. यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूरच्या दोन्ही जागा प्रतिष्ठेच्या केल्या असल्याचे दिसून आले. मात्र, प्रकाश आवाडे माघार घेत नसल्याने महायुतीची हातकणंगलेमध्ये कोंडी झाली होती. प्रकाश आवाडे यांच्या बंडखोरी मागे कोण? असा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला होता. मात्र, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आवाडे यांच्या घरी जात त्यांची मनधरणी करीत अखेर बंड मोडून काढलं आहे. त्यामुळे माने यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# सांगलीत ठाकरे गटाला मोठा धक्का

## काँग्रेसच्या विशाल पाटलांकडून अपक्ष अर्ज दाखल

**सांगली-** सांगली मतदारसंघात ठाकरे गट आणिकाँग्रेसयांच्यातील वाद विकोपाला गेला असून विशाल पाटील यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. सांगलीची जागाकाँग्रेसलामिळावी यासाठी सातत्याने स्थानिक नेते आग्रह धरत होते. परंतु मविआत ही जागा ठाकरे गटाला देण्यात आली असून याठिकाणी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे काँग्रेसमध्ये प्रचंड नाराजी उफाळून आली आहे.महाविकास आघाडीसांगलीबाबतचा निर्णय बदलेल अशी आशा स्थानिक नेत्यांना आहे. त्यासाठी नागपूर येथे काँग्रेस नेत्यांची बैठक होणार आहे. परंतु तत्पूर्वी विशाल पाटील यांनी अपक्ष निवडणुकीचा अर्ज दाखल केला आहे. त्यात मंगळवारी काँग्रेस जिल्ह्यात मेळावा घेऊन शक्तिप्रदर्शन करणार आहे. यानंतर विशाल पाटील आणखी एक अर्ज भरतील जो काँग्रेसकडून असेल. काँग्रेसकडून अधिकृत उमेदवारी मिळेल या आशेवरही नेते आहे. आज मोजक्या कार्यकर्त्यांसह विशाल पाटील यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला. परंतु मंगळवारी सांगलीत शक्तिप्रदर्शन करत आणखी एक उमेदवारी अर्ज भरणार आहेत. याबाबत विशाल पाटील यांनी माहिती दिली की, सांगली लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज उद्या दाखल करणार आहे, तत्पूर्वी आज खरसुंडी येथे आमचे कुलदैवत सिद्धनाथाच्या चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले. आपल्या सर्वांचे आशीर्वाद आणि सिद्धनाथाची कृपादृष्टी नेहमीच पाठीशी राहिली आहे. येणारा काळ कसोटीचा असला तरी सोबत संघर्षाचा वारसा आणि आपल्या सर्वांच्या प्रेमाचे असणारे पाठबळ अगणित ऊर्जा देणारे आहे असं त्यांनी सांगितले. विशाल पाटील यांनी आता अपक्ष निवडणूक लढवण्याची तयारी केल्यानं जतचे भाजपाचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी विशाल पाटील यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

या पाठिंब्यामुळे खासदार संजयकाका पाटील यांच्या अडचणी वाढल्याचे बोलले जात आहे. गेल्या काही दिवसांपासून माजी आमदार विलासराव जगताप यांनी खासदार संजयकाका पाटील यांच्या उमेदवारीवरुन नाराजी व्यक्त केली होती.

# 'श्रीकांत शिंदेंकडून ५०० कोटींचा घोटाळा,' संजय राऊतांचा गंभीर आरोप

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीतील प्रचाराचा धुरळा उडत असताना दुसरीकडं सत्ताधारी आणि विरोधक प्रचारात एकमेकांवर आरोपांच्या फैरी झाडत आहेत. आज ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी माध्यमांशी संवाद साधताना शिंदे गटाचे खासदार आणि मुख्यमंत्र्यांचे सुपुत्र श्रीकांत शिंदे यांच्यावर ५०० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप केला आहे. संजय राऊतांच्या या आरोपावरुन आता चांगलाच गदारोळ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

फाऊंडेशनच्या नावाखाली ५०० कोटीचा घोटाळा : संजय राऊत म्हणाले की, ''श्रीकांत शिंदे यांचं फाऊंडेशन आहे. त्या 'श्रीकांत शिंदे फाऊडेशन'च्या नावाखाली ५०० कोटींचा घोटाळा झाला आहे. सामाजिक कार्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा भष्टाचार आणि लूट झाली आहे. धर्मादायच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची लूट सुरु आहे. हा पैसा पक्ष, निवडणूक, आमदार, खासदारांना आपल्या पक्षात घेणं, पक्ष फोडणं यासाठी वापरला जात आहे,'' असा गंभीर आरोप संजय राऊतांनी खासदार श्रीकांत शिंदे आणि भाजपावर केला आहे.

ईडी, सीबीआयमध्ये तक्रार करणार : ''मुख्यमंत्री कार्यालयात बसून कंत्राट वाटप केले जात आहेत. देणग्या घेतल्या जात आहेत. हा मोठा घोटाळा आहे. एक दोन नाहीतर ५०० कोटीचा घोटाळा 'श्रीकांत शिंदे फाऊंडेशन'च्या माध्यमातून केला गेला आहे. धर्मादायच्या नावाखाली कोट्यवधी रुपये लोकांकडून देणग्याच्या स्वरुपात घेतले गेले आहेत. याबाबत आपण ईडी चौकशी व्हावी, अशी मी मागणी करत आहोत. आम्ही ईडी, सीबीआय यांच्याकडं उद्या किंवा परवा तक्रार करणा आहोत.

# माढ्याचा तिढा सुटण्याच्या मार्गावर

## विशेष विमानाची नागपूरवारी यशस्वी ठरण्याची चिन्हं

**नागपूर :** सोलापूर आणि माढा परिसरातील ज्येष्ठ धनगर नेते उत्तम जानकर यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली. जानकर माढा आणि सोलापुरात महायुतीला पाठिंबा देणार का, याबद्दल ते आज संध्याकाळी निर्णय घेणार आहेत. जानकर यांनी मविआचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांना उमेदवारी देण्याचं ठरवलं होतं. मात्र त्यामुळे आपल्या उमेदवाराला फटका बसेल असं भाजपला वाटलं, आणि त्यानंतर फडणवीसांनी त्यांना तात्काळ नागपूरला बोलावून घेतलं. त्यांच्यासाठी बारामतीत विशेष विमानाची देखील सोय केली होती. दरम्यान, फडणवीसांची सकारात्मक चर्चा झाली, आज संध्याकाळी सात वाजता आपल्या कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यावर निर्णय जाहीर करू, असं जानकरांनी माध्यमांना सांगितलं. ते नागपुरात बोलत होते.

उत्तम जानकर हे धैर्यशिल मोहितेंना पाठींबा देण्याच्या तयारीत होते. मात्र तसं झालं तर महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना फटका बसू शकतो असं भाजपला वाटलं, आणि म्हणून उत्तम जानकरांना आपल्याकडे वळवण्याचे प्रयत्न भाजपनं सुरू केला. त्याचाच भाग म्हणून बारामतीला विशेष विमान पाठवण्यात आलं. एवढंच नाही तर जानकरांना दिल्लीत अमित शाहांची भेट घडवून देतो असं आश्वासन दिल्याचीही माहिती मिळतेय. जानकरांनी मात्र अजून ठोस निर्णय जाहीर केलेला नाही. फडणवीसांशी चर्चा झाल्यावर आपण कार्यकर्त्यांशी बोलून निर्णय जाहीर करू असं जानकर म्हणालेत.

फडणवीसांशी चर्चा सकारात्मक : उत्तम जानकर

फडणवीसांच्या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना जानकर म्हणाले, माढा आणि सोलापूर लोकसभा मतदार संघाचा विषयी सविस्तर चर्चा झाली. आमच्या अडचणींवर सकारात्म चर्चा झाली. संध्याकाळी ७ वाजता कार्यकर्त्यांशी चर्चा करु. तालुक्यातील कार्यकर्त्यांच्या ज्या अडचणी होत्या त्या फडणवीसांकडे मांडल्या आहेत. बैठक सकारात्मक झाली. माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघाचा विषय होता. जवळपास एक तास बैठक झाली. त्यात आमच्या अडचणी, आमच्या मुद्दे याविषयी चर्चा झाली. चर्चा सकारात्मक झाली. काही प्रमुख नेते मंडळी बैठकीत निर्णय घेऊ. बैठकीत झालेल्या चर्चा कार्यकर्त्यांना सांगणार आहे. दहा वर्षातील अनेक अडचणी त्या देवेंद्र फडणवीसांसमोर मांडल्या आहेत. सोलापुरत बैठक होणार आहे.

कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यावर निर्णय जाहीर करू : उत्तम जानकर

नाराजीतून भाजप सोडण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चावर जानकर म्हणाले, त्यामुळेच आम्ही फडणीसांकडे आलो. फडणवीसांनी आमचे म्हणणे ऐकले आणि जे आश्वासन दिले ते कार्यकर्त्यांना सांगू त्यानंतर पुढील निर्णय जाहीर करण्यात येईल.

# मोहिते- पाटलांच्या प्रवेशाने राजकीय गणिते बदलली

**पंढरपूर :** माढा लोकसभेच्या निवडणूक रिंगणात राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार ) पक्षात धैर्यशील मोहिते पाटलांच्या प्रवेशानंतर राजकीय गणिते बदलली आहेत. सातारा जिल्ह्यातील खासदार रणजितसिंह निंबाळकर-जयकुमार गोरे या दोघांच्या विरोधातील नाराज मंडळी एकत्र येऊ लागल्याने भाजपपुढे कडवे आव्हान उभे ठाकले आहे.

भाजपने विद्यमान खासदार रणजिंतसिंह निंबाळकर यांना पुन्हा उमेदवारी जाहीर करताना नाराजी सुरु झाली. या नाराज झालेल्यांची मनधरणी करताना उमेदवाराची आणि भाजपा वरिष्ठांची पुरती दमछाक उडाली. मात्र भाजपातील बंडाला भाजपला विरोध नसून वैयक्तिक विरोध हे एक कारण पुढे येत आहे. तसेच या माध्यमातून आगामी विधानसभेच्या निवडणुकीची तयारी देखील केली जात आहे. तर दुसरीकडे शरद पवार, सुशीलकुमार शिंदे आणि विजयसिंह मोहिते – पाटील हे तिघे दहा वर्षानंतर एकत्र आले. त्यामुळे पुन्हा एकदा जिल्ह्यातील राजकारणावर मोहिते-पाटील यांचे वर्चस्व प्रस्थापित होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

माढा लोकसभा आणि सोलापूर लोकसभा हा राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला होता. माढा लोकसभेवर शरद पवार त्यानंतर विजयसिंह मोहिते पाटील तर २०१४ साली भाजपाचे रणजितसिंह नाईक निबांळकर निवडून आले. माढा लोकसभेच्या गेल्या निवडणुकीत मोहिते पाटील हे शरद पवारांची साथ सोडून भाजपात गेले आणि नवखे रणजितसिंह निंबाळकर यांना विजयी करण्यात त्यांचा



मोठा वाटा होता. मात्र गेल्या पाच वर्षात निंबाळकर आणि मोहिते यांच्यात दुरी आली आणि निंबाळकरांना विरोध सुरु झाला. पुढे उमेदवारी जाहीर झाल्यावर देखील मोहिते पाटलांची नाराजी राहिली. ही नाराजी दूर कार्णयात्साठी भाजपाने मंत्री गिरीश महाजन यांना पाठवले मात्र त्यात यश आले नाही. पुढे धैर्यशील मोहिते पाटलांनी मतदारसंघ पिंजून काढला. तर ही जागा शरद पवार गटाकडे होती. त्यामुळे शरद पवारांनी दूर गेलेले मोहिते पाटील यांना जवळ करण्याचे डाव सुरु केले.

नाराज मोहिते पाटलांनी अखेर तुतारी हाती घेण्याचा निर्णय केला. मात्र भाजपाचे विधान परिषद सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील हे भाजपा सोडणार नाही असे त्यांचे चुलते जयसिंह मोहिते पाटील यांनी जाहीर केले. आणि अकलूज येथे धैर्यशील मोहिते पाटील यांचा शरद पवार गटात प्रवेश झाला. यामध्ये केवळ मोहिते पाटीलच एकटे नारज नव्हते. तर फलटणचे रामराजे निंबाळकर, करमाळ्याचे माजी आमदार नारायण पाटील, माढा येथील संजय कोकाटे, माळशिरसचे उत्तम जानकर यांच्यासह काही मंडळी नाराज होते. हे सारे गणित शरद पवार यांनी जाणून पुन्हा एकदा पक्ष उभारणी आणि जुन्या नेते मंडळीना एकत्र आणण्यात यश मिळवले. तसेच गेल्या काही वर्षात शरद पवार, सुशीलकुमार शिंदे आणि विजयसिंह मोहिते पाटील यांनी एकत्र काम करून जिल्ह्याच्या आणि राज्याच्या राजकारणात एक दबदबा निर्माण केला होता. ते तिघे पुन्हा एकत्र आले आहेत. त्यामुळे राजकीय गणिते बदलू लागली.

अनेक नेते मंडळींना आगामी विधानसभेसाठी तयारी करण्यासाठी आणि महायुतीला पर्याय म्हणून शरद पवार गटाकडे इच्छुक असल्याचे चित्र दिसत आहे. याचा राजकीय फटका भाजपाला बसण्याची शक्यता आहे. यामध्ये भाजपाचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांची कसोटी लागणार आहे. एकीकडे पक्ष तर दुसरीकडे चुलत भाऊ. त्यामुळे कोणाला झुकते माप देणार हे पहावे लागणार आहे. माढा लोकसभा निवडणूक ही सुरवातील सरळ वाटत होती, मात्र आता निंबाळकर आणि मोहिते पाटील अशी लढत होईल. यात भाजपा आता कोणती रणनीती वापरणार हे पाहणं औत्सुक्याचे ठरणार आहे.

# खासदार डॉ. अमोल कोल्हे हे एक सुसंस्कृत लोकप्रतिनिधी – सुप्रिया सुळे

**पुणे :** शिरुर लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा दोन दिवसांपूर्वी पार पडला. या मेळाव्यात अजित पवार म्हणाले की, तुम्हाला कार्यसम्राट खासदार पाहिजे की, नटसम्राट खासदार? असे म्हणत त्यांनी खासदार अमोल कोल्हे यांना टोला लगावला होता. यावर अमोल कोल्हे यांनी ट्विटद्वारे प्रतिक्रिया दिली असून यावर सुप्रिया सुळे यांनीदेखील प्रतिक्रिया दिली आहे.

अजित पवार यांच्या टीकेला प्रतिक्रिया देत अमोल कोल्हे यांनी ट्विटर करत उत्तर दिले. कार्यसम्राट की नटसम्राट माहीत नाही, पण स्वकर्तृत्वसम्राट नक्की! असं ट्विट करत माझ्या काकांच्या पुण्याईवर मी डॉक्टर, अभिनेता नाही तर स्वकर्तृत्वावर मी माझी ओळख असल्याचे सांगत अमोल कोल्हे यांनी अजित पवार पवार यांना सुनावले होते. त्यावर सुप्रिया सुळे यांनी देखील विधान केले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, हे दुर्देव आहे. अमोल कोल्हे हे एक अतिशय सुसंस्कृत लोकप्रतिनिधी आहेत. अमोल कोल्हे यांचे संसदेतील काम सर्वोत्तम असून त्यांनी मतदारसंघातदेखील खूप विकास कामे केली आहेत. त्यामुळे कोणी काय बोलावं हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे, अशी भूमिका यावेळी त्यांनी मांडली.

# महाबळेश्वर बाजारपेठ सुशोभीकरण आराखडयाचा बोजवारा

**राजदंड / महाबळेश्वर**

महाबळेश्वर बाजारपेठ सुशोभीकरण आराखडयाचा पुरता बोजवारा उडाला आहे. पुढेही जाता येत नाही आणि आता माघारीही फिरता येत नाही, अशी अवस्था या प्रकल्पाची झाली आहे. त्यामुळे महाबळेश्वरकरांना फक्त आणि फक्त मनस्ताप सहन करावा लागत आहे. उन्हाळी हंगाम सुरू असून जर रस्त्याचे काम पूर्ण झाले नाही तर पावसाळा कसा काढायचा, असा प्रश्न आता महाबळेश्वरकरांना सतावत आहे. प्रशासनाच्या या भोंगळ कारभारामुळे शहरवासीय हवालदिल झाले आहेत.

■ **आर्किटेक्टची निवड चुकीची**

आंतरराष्ट्रीय दर्जाला शोभेल असा आराखडा तयार करण्यात आला होता; परंतु या आराखडयाला न्याय देणारी यंत्रणा कुचकामी ठरली. १०० कोटींचा आरखडा तयार करण्याची कल्पना चांगली होती. मात्र, आराखडा तयार करण्याची जबाबदारी चुकीच्या व्यक्तीवर सोपविण्यात आली. ज्या पंकज जोशी यांनी हा आराखडा तयार केला, तो मुंबईच्या कार्यालयात बसून केला. त्यांनी शहराचा कोणताही अभ्यास केला नाही. येथील पर्यटन, पर्यावरण, राहणीमान, मुलभूत सुविधांचे जाळे याबाबतीत कोणताही विचार केला नाही. केवळ इतर शहरांच्या बाजारपेठेची कॉपी करण्याच्या नादात कागदावर आराखडा तयार करून स्वतःचा आर्थिक फायदा करून घेतला.

■ **ठेकेदाराकडे मनुष्यबळ व नियोजनाचा अभाव**

महाराष्ट्राच्या नंदनवनास आराखडयाच्या रूपाने सुंदर साज चढविण्यासाठी जो आराखडा तयार केला होता, त्या आराखडयाची अंमलबजावणी करण्याची महत्वाची जबाबदारी ही ठेकेदाराची होती. त्यामुळे त्याला कामाचा किती अनुभव आहे हे पाहूनच ठेकेदाराची निवड करणे आवश्यक होते; परंतु येथे असे झाले नाही. ज्या ठेकेदाराने देशात एकही रस्ता तयार केला नाही अशा ठेकेदारास बाजारपेठ सुशोभिकरणाचे कंत्राट देण्यात आले त्या मुळे कामाचा दर्जाही गेला आणि आराखडयाचा बोजावारा उडाला नागरीक आता ठेकेदार बदलण्याची मागणी करीत आहेत परंतु ते शक्य नाही असे प्रशासन सांगत आहे जर ते शक्य नसेल तर अनुभवी माणसाचा सल्ला घेवुन उर्वरीत काम हे उत्तम दर्जाचे करून हे काम पुर्ण केले पाहीजे परंतु आता हे काम म्हणजे सुशोभिकरण कमी विद्रुपीकरण जास्त वाटत आहे



■ **पालकमंत्री यांचा अवाजवी हस्तक्षेप**

मुळ बाजारपेठ सुशोभिकरणाचा आराखडा सुंदर होता या आराखडयामुळे बाजारपेठेतील रस्ता मोठा झाला असता आणि संपुर्ण बाजारपेठेचे रूपडे पालटले असते परंतु आता कामाची गती स्थिती आणि निकृष्ट दर्जा पाहता मुळ आराखडा रदद् झाला ते योग्यच झाले असे आता काही नागरीक बोलु लागले आहेत कारण प्रारंभा पासुनच या आराखडयात त्रुटी राहील्या आणि ज्यांना महाबळेश्वर विषयी आस्था नाही अशा पालकमंत्री यांनी मोठया प्रमाणावर या आराखडयात हस्तक्षेप केला काही नागरीकांनी तर असे आरोप केले आहेत की पालकमंत्री यांनी हेतु पुरस्सर या आराखडयात सतत बदल केले आहेत आणि त्या मुळेच या आराखडयाचा बोजवारा उडाला आहे

■ **कामाचा अनुभव नसलेले प्रशासक**

राज्यातील क वर्गातील सर्वात मोठी श्रीमंत नगरपालिका म्हणुन महाबळेश्वर पालिकेची राज्यात ओळख आहे नंदनवनाचे रूपडे पालटणारा आराखडा राबविला जात आहे अशा वेळी येथील मुख्याधिकारी यांची बदली झाली आणि एका नगरपंचायतीची जबाबदारी सांभाळणारे मुख्याधिकारी योगेश पाटील यांची महाबळेश्वर येथे बदली केली पाटील यांनी पुर्ण क्षमतेने या आराखडयाला न्याय देण्याचा प्रयत्न केला परंतु अनुभवा अभावी ठेकेदाराकडुन हवा तसा प्रतिसाद न मिळाल्याने त्यांचे हे प्रयत्न अपुरे पडले असे म्हणावे लागेल

हतबल जिल्हा प्रशासन आराखडयाची अंमलबजावणीची संपुर्ण जबाबदारी ही राज्य शासनाने जिल्हा प्रशासनावर टाकली हाती जिल्हा प्रशासनाने पुर्ण तयारी केली होती परंतु या तयारीला राजकीय हस्तक्षेपामुळे खो बसला जिल्हा प्रशासनाने



कोणताही निर्णय घेतला तरी ज्या निर्णला राजकिय हस्तक्षेपा मुळे खो बसत होता त्या मुळे जिल्हा प्रशासन आराखडयाची अंमलजबावणी मना प्रमाणे करता येत नाही एकीकडे राजकीय हस्तक्षेप तर दुसरीकडे शहरातील नागरीक अशा कात्रीत जिल्हा प्रशासन अडकले आहे त्या मुळे जिल्हा प्रशासन या आराखडयाची अंमलबजावणी करताना पुरते हतबल झालेले हिसत आहे

■ **नेतृत्वाचा लागणार कस**

बाजारपेठेतील रस्त्यावर दगड बसविण्याच्या काम पुर्ण करण्यासाठी संतप्त झालेल्या नागरीकांनी दहा दिवसांचा अल्टीमेटम दिला आहे त्या मुळे बाजारपेठेतील रस्त्याचे काम दहा दिवात पुर्ण करण्यासाठी पालिकेचे नेतृत्व करणारे प्रशासक योगेश पाटील यांचा कस लागणार आहे बिन भरवशाच्या ठेकेदारा कडुन काम पुर्ण करताना पाटील यांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

# निवडणूक प्रशिक्षणाला ६८ जणांची दांडी; गैरहजर असणाऱ्यांना प्रांताधिकाऱ्यांचे नोटीस

**राजदंड / दहिवडी**

४३ माढा लोकसभा मतदारसंघांतर्गत २५८ माण विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या पहिल्या प्रशिक्षणास बोलविलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यापैकी ६८ जण अनुपस्थित राहिले. या सर्वांना प्रांताधिकारी उज्वला गाडेकर यांनी नोटीस बजावली आहे. तर ड्युटी (कर्तव्य) रद्द करण्यासाठी १३४ जणांनी अर्ज केले आहेत.

निवडणूक प्रक्रिया सुरळीत व्हावी, प्रक्रियेची सखोल माहिती व्हावी, मतदान यंत्रांचे प्रात्यक्षिक या व इतर बाबींसाठी येथील स्वाती मंगल कार्यालयात प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यात केंद्राध्यक्ष ४६३, पहिला मतदान अधिकारी ४६२ तसेच इतर मतदान अधिकारी ११४६ अशा एकूण २०७१ जणांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्ष प्रशिक्षणावेळी केंद्राध्यक्ष २३, पहिला मतदान अधिकारी १५, इतर मतदान अधिकारी ५६ अनुपस्थित होते. यात दुबार आलेली नावे वगळून एकूण ६८ जण अनुपस्थित होते. प्रशिक्षणात ड्युटी (कर्तव्य) रद्द करण्यासाठी ३२ केंद्राध्यक्ष, २९ पहिला मतदान अधिकारी व ७३ इतर मतदान अधिकारी यांनी अर्ज केले होते. तर प्रशिक्षणात ड्युटी बदलून मिळण्यासाठी ४ केंद्राध्यक्ष, ३ पहिला मतदान अधिकारी व ४ इतर मतदान अधिकारी अशा एकूण ११ जणांनी अर्ज सादर केले होते.

अनुपस्थित असणाऱ्या ६८ जणांना प्रांताधिकारी तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी उज्वला गाडेकर यांनी नोटीस बजावली आहे. तसेच दुबार नावे पकडून १६५ जणांची ड्युटी रद्द करण्यात आली आहे.

# मसूरनजीक पावणेदोन लाखांचा गांजा पकडला; पंढरपूरच्या दोघांना अटक

**राजदंड / मसूर**

पावणे दोन लाखांचा गांजा रिक्षातून चोरटी वाहतूक करताना मसूर नजीकच्या माळवाडी हद्दीत मल्हारपेठ - पंढरपूर राज्य मार्गावर पोलिसांनी पकडला. या मार्गावरून अवैद्य गांजाची रिक्षातून चोरटी वाहतूक होत असल्याची माहिती कराडला उपविभागीय कार्यालयाला मिळाली. शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास मसूरसह कराड पोलिसांच्या पथकाने रिक्षा पकडली. गांजाची चोरटी वाहतूक करणाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरच्या दोघांना पोलिसांनी रिक्षासह ताब्यात घेतले आहे. संतोष हनुमानसिंग चंदेले, वय ४८ व सोमनाथ दिलीप चंदेले, वय १८, दोघेही राहणार संतपेठ सांगोलारोड पंढरपूर. जिल्हा सोलापूर या दोघांना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे. त्यांना न्यायालयापुढे उभे केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली.



सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरचे दोघेजण रिक्षा क्रमांक एम एच १३ ए डी ०८८६ मधून गांजाची अवैद्य चोरटी वाहतूक मल्हारपेठ - पंढरपूर मार्गावरून शामगाव घाटातून करीत असल्याची माहिती वरिष्ठ पातळीवरील पोलिसांना मिळाली. त्यानुसार या मार्गावर मसूर नजीकच्या माळवाडी हद्दीत मसूरसह व कराड उपविभागीय अधिकारी अमोल ठाकूर यांच्या पोलीस पथकांच्या पोलिसांनी सापळा रचला. रिक्षा येताच ती थांबवण्यात आली. रिक्षातून गांजाची चोरटी वाहतूक करणाऱ्या दोघांना रिक्षा व गांजासह ताब्यात घेतले व त्यांना अटक करण्यात आली. रिक्षात तपासणी केली असता साडेतीन किलो वजनाचे पॅकेट सापडले. त्याची किंमत १ लाख ७४ हजार ३१० रुपये आहे. रिक्षात सापडलेला गांजा विक्रीस नेण्यात येत होता. त्यांना न्यायालयापुढे उभे केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल शेलार अधिक तपास करीत आहेत.

# मानवी साखळीद्वारे भारताचा नकाशा बनवून मतदार जागृती संदेश

■ **पंचायत समिती, शिक्षण विभाग खटावचा राष्ट्रीय कर्तव्य मतदान अनोखा उपक्रम**



**राजदंड / वडूज**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर मतदार जागृती होऊन मतदानाचा टक्का वाढावा हा उद्देश ठेवून खटाव तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या गटशिक्षणाधिकारी प्रतिभा भराडे यांच्या संकल्पनेतून वडूज येथे छत्रपती शिवाजी हायस्कूल संकुलाच्या मैदानावर खटाव तालुक्यातील सर्व शासकीय सेवा विभाग व शाळा संकुले यांच्या एकत्रित प्रयत्नाने मतदार स्त्री - पुरुष, नव मतदार तरुण - तरुणी व मतदान मदतनीस अधिकारी व कर्मचारी यांची अखंड मानवी साखळी बनवून,त्याद्वारे आपल्या भारत देशाचा आकर्षक नकाशाची हुबेहूब प्रतिकृती बनवण्यात येवून सर्वांनी मोठ्या संख्येने मतदान करण्याचा अनोखा संदेश देण्यात आला. यावेळी सातारा, माढा शंभर टक्के मतदान व तिरंगा ध्वज रांगोळी प्रतिकृती काढण्यात आली होती.उपस्थित सर्वांनी भगवे, निळे,हिरवे,पांढरे पोशाख व टोप्या परिधान करून, राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला.

यावेळी तहसीलदार बाई माने, गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील,शिक्षण विस्तार अधिकारी सोनाली विभुते,संगीता गायकवाड,नगर पंचायत मुख्यअधिकारी कपिल जगताप आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मतदार जनजागृती हा एक राष्ट्रीय कार्यक्रम असून,खटाव हा तालुका मतदार संघ लोकसभेला सातारा व माढा अशा दोन मतदार संघात विभागाला गेला असून ,विधान सभा मतदार संघ माण म्हणून ओळखला जातो.या मतदार संघातून आगामी लोकसभेला सर्व गावातील वाडी - वस्ती वरील मतदान केंद्रातून मोठ्या प्रमाणावर मतदान करून घेतले जाईल .अशा प्रकारची सर्व तयारी प्रशासनाने केली आहे.त्याचे निश्चितच चांगले सकारात्मक परिणाम आपल्याला मतदानाचा टक्का वाढल्याने दिसणार आहेत.खटाव तालुक्यातील सर्व शासकीय विभागांनी हा अनोखा कार्यक्रम करण्यासाठी आमच्या विभागाला मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले आहे असं मत यावेळी तहसीलदार बाई माने यांनी व्यक्त केलं.तर अशा उपक्रमांद्वारे खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणावर मतदान जागृती होण्यास हातभार लागणार असल्याचं गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितलं.उपस्थितांना मतदान जन जागृतीची प्रतिज्ञा शपथ यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमास प्राचार्य जे. एच. जाधव, प्राचार्य एम. एस. गोडसे यांचे खूप मोठे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक राजेंद्र जगदाळे, प्रसाद जगदाळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी गायकवाड मॅडम,ओंबासे मॅडम, नोडल प्रतिनिधी प्राद्यापक अजय शेटे, कला शिक्षक बोटकर, विजय शेंडगे,भागवत, धर्माधिकारी मुख्याध्यापिका शितल शिंदे, शिक्षण सुलभक लक्ष्मण जाधव, गणपत पवार या शिक्षकांचे मोठे सहकार्य लाभले.

यावेळी हुतात्मा परशुराम विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, छत्रपती शिवाजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, सर्व शाळा, अंगणवाडी सेविका व मदतनीस, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

# 'गीत सुमनांजली' भावगीत मैफिलीने रसिक मंत्रमुग्ध!

**पुणे** : भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'गीत सुमनांजली ' या भावगीत मैफिलीचे आयोजन शनिवारी सायंकाळी करण्यात आले होते. ज्येष्ठ व्हायोलिनवादक पं. प्रभाकर जोग,आणि ज्येष्ठ गायिका सुमन कल्याणपूर यांच्या गाजलेल्या भावगीतांचे सादरीकरण या कार्यक्रमात करण्यात आले .जुना सुवर्णकाळ जागा करणाऱ्या आणि स्मरणरंजन करणाऱ्या या मैफिलीने रसिक भारावून गेले.वीणा जोगळेकर,दीपक कुलकर्णी यांनी ही गीते सादर केली .चारुशिला गोसावी (व्हायोलिन ),ओमकार पाटणकर (तबला), उद्धव कुंभार (साईड रिदम) यांनी साथसंगत केली. स्मिता अमृतकर यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले.




हा कार्यक्रम शनिवार,१३ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी साडे पाच वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे झाला.हा कार्यक्रम विनामूल्य होता.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २०१ वा कार्यक्रम होता.

कार्यक्रमाची सुरुवात 'गणेश वंदना' आणि 'गुरुर्ब्रह्मा' या श्लोकाने झाली.यानंतर 'गुरुने दिला ज्ञानरूपी वसा','शुभंकरोती म्हणा','लपविलास तू हिरवा चाफा', 'स्वर आले दुरूनी','झिम झिम झरती श्रावण धारा', 'नकळत सारे घडले', 'लिंबलोण उतरू कशी','कशी करु स्वागता' ही भावगीते सादर केली गेली.या सादरीकरणाला रसिकांनी भरभरून दाद दिली.मेलडी मधे' जिथे सागरा' ,'घाल घाल पिंगा वाऱ्या' , 'लिंबोणिच्या झाडामागे चंद्र' , 'ते नयन बोलले काहीतरी' , 'अरे संसार संसार' ही गीते सादर केली.'खरा तो प्रेमा'सारखे ' संगीत मानापमान 'या नाटकातले हे गीत पहाडी मांड या रागावर आधारित आहे. ते विशेष दाद मिळवून गेले. शास्त्रीय रागावर आधारित काही हिंदी गीते देखील दाद मिळवून गेली,संगीतकार मदन मोहन,सलील चौधरी यांनी स्वरबद्ध केलेली गीतेही सादर करण्यात आली. 'सलोना सा सजन है',' रसमे उल्फत', 'ना जिया लागे ना ','नैनोमें बदरा छाए', 'जिया ले गयो जी मोरा', 'राम का गुणगान करिये ' या गीतांनी रसिकांची पसंती मिळवली.

# मन प्रसन्न ठेवण्यासाठी पंचसूत्रांचा आधार घ्यावा – डॉ. संजय उपाध्ये

## डॉ. उपाध्ये यांचा पहिला 'जनसंस्कार' पुरस्काराने गौरव

**पुणे** : ''जीवनात सदैव प्रसन्न राहण्यासाठी प्रथम मी जीवंत आहे, द्वितीय रोज स्वतःला आरशात पहा, तृतीय समोरील व्यक्तीचे बरोबर आहे, चतुर्थ शरीर व मन मजबूत राहण्यासाठी रोज व्यायाम करा आणि आयुष्यभर शिकत रहा. या पंचसुत्रांच्या आधारे मनःशांती मिळते असा सल्ला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये यांनी दिला.

स्व. मनसुखलालाजी गुगळे स्मृतीप्रित्यर्थ तनुश्री गर्भसंस्कार परिवारातर्फे न्यू सांगवी येथील साई चौक स्थित संस्कृती लॉन्समध्ये आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध गप्पष्टककार व अष्टपैलू व्यक्तिमत्व डॉ. संजय उपाध्ये यांना पहिला 'तनुश्री जनसंस्कार पुरस्कार' डॉ. सुप्रिया गुगळे, डॉ. अनिल गुगळे व डॉ. तन्वी गुगळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच ' मुद्रा शक्ती' पुस्तकाचे प्रकाशन डॉ. गोपल बोहरा, अनिल शर्मा व मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी मंचावर अभिनेत्री शिवानी सोनार, डॉ. यश वेलणकर, अभिनेत्री गार्गी फुले, अभिनेत्री प्राजक्त हनमघर, बालकलाकार अन्यया टेकावडे , वैद्य सुनीमय दामले, डॉ. सुगंधा रानडे, ब्रह्माकुमारी संजीवनी दीदी, डॉ. अनुप भारती उपस्थित होते.

डॉ. संजय उपाध्ये म्हणाले, ''जीवनात खूप मोठे तत्वज्ञानी बनण्यापेक्षा विनोदी बना. माणासाने रसग्रहण करण्याची क्षमता वाढवावी. मन अप्रसन्न होण्याच्या प्रमुख कारणांमध्ये आपल्या मनासारखे न




घडणे, स्वतःची इमेज झटकून सर्वांमध्ये न मिसळणे आणि घरातील वर्तमानपत्र मन प्रसन्न करत नाही. जीवनात श्वास, विश्वास आणि आत्मविश्वास अत्यंत महत्वाचा आहे.

डॉ. सुप्रिया गुगळे म्हणाल्या,''मोबाइलच्या काळात मानवाचा एक मेकांशी सूर हरविला आहे. तो सूर शोधण्यासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तनुश्री परिवार हा सर्वाच्या मनाच्या ठाव घेऊन स्वतःशी संवाद साधण्यासाठी कार्य करीत आहेत.

डॉ. अनुप भारती म्हणाले, ''मोबाइल ने ब्रेन कॅप्चर केला आहे. लहान मुलांचा मेंदू पूर्ण प्रगत न झाल्याने त्यांना योग्य व अयोग्याचे निर्णय घेता येत नाही. रिल्समुळे व्यक्ती हा आभासी जगात वावरतांना दिसतो. त्यातच सोशल मिडिया मानवाला बोथट करीत आहे. मोबाइलमुळे संशयीपणा, मानसिक आजार हे वाढतांना दिसत आहेत. त्यामुळे या पासून दूर रहा.

डॉ. यश वेलणकर म्हणाले,''सतत विचार करीत राहणे ही आजच्या काळातील सर्वात मोठी समस्या आहे. त्यातच मोबाइलमुळे ओव्हर थिंकिंग वाढत आहे. अशा वेळेस सजगता आणि भान ठेऊन मन प्रसन्न ठेवता येते.

त्यानंतर अभिनेत्री प्राजक हनमघर, अभिनेत्री गार्गी फुले, अभिनेत्री शिवानी सोनार, वैद्य सुविनय दामले, डॉ. तन्वी गुगळे व अन्य मान्यवरांनी आपले विचार मांडले.

या प्रसंगी किशोर खाबिया, शुभांगी दामले,विजय जकातदार, प्रविण खाबिया, उषा जैन यांच्या सहित अन्य व्यक्तिंचाही सत्कार करण्यात आले.

या नंतर 'मिले सूर हमारा तुम्हारा' या अनोख्या थीमच्या माध्यमावर गाण्यांचा कार्यक्रम झाला. डॉ. भाग्यश्री कश्यप यांनी सूत्रसंचालन केले. श्री. मुनोत यांनी आभार मानले.

# सिद्धार्थनगर येथे मतदान जनजागृती



**राजदंड / कोरेगाव**

कोरेगाव तालुक्यातील सिद्धार्थनगर येथे मतदान जनजागृती कार्यक्रम उत्साहात झाला. ५० टक्के पेक्षा कमी मतदान असणाऱ्या मतदान केंद्रांवर विशेष भर दिला जात आहे. त्या अंतर्गत हा उपक्रम घेण्यात आला. नागरिकांसह चिमुकल्यांनी मतदान जनजागृती विषयक घोषणा देत या उपक्रमात सहभाग घेतला.

यावेळी पंचायत समितीच्या कृषी अधिकारी हेमांगी शेडगे, पर्यवेक्षिका उर्मिला साळुंखे, ग्रामसेवक विनोद बनकर ,मतदान जनजागृती पथकप्रमुख यशेंद्र क्षीरसागर आदी अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी श्रीमती शेडगे यांनी मार्गदर्शन केले. मतदान जनजागृती शपथ यावेळी सर्वांनी घेतली.

# ७ कुख्यात नक्षलवाद्यांना सुरक्षा दलांनी ठोकल्या बेड्या; एकावर होतं 'इतकं' बक्षीस

**रायपूर :** नक्षलवाद्यांचा गड मानल्या जाणाऱ्या सुकमा जिल्ह्यात रविवारी ७ नक्षलवाद्यांना सुरक्षा दलांनी अटक केलं. या पकडण्यात आलेल्या नक्षलवाद्यांमध्ये एका नक्षलवाद्यावर १ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. निवडणुकीपूर्वी एकाचवेळी ७ नक्षलवाद्यांना अटक केल्यानं जवानांचं म नोबल उंचावलं आहे. विशेष म्हणजे पकडण्यात आलेले नक्षलवादी निवडणूक काळात मोठा घातपात घडवण्याच्या तयारीत होते, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

**निवडणूक काळात राबवण्यात आली शोधमोहीम :** सध्या लोकसभा निवडणूक २०२४ ची रणधुमाळी जोरात सुरू आहे. सुरक्षा दलांनी निवडणुकीच्या काळात बस्तरसह सुकमा परिसरात मोठा चोख बंदोबस्त ठेवला आहे. निवडणूक असल्यानं सुरक्षा दलांनी किस्त्रम परिसरात शोधमोहीम राबवली. यावेळी सुरक्षा दलांना ७ नक्षलवाद्यांना बेड्या ठोकण्यात यश आलं.

**कुख्यात नक्षलवाद्यांना ठोकल्या बेड्या :** सुकमा जिल्ह्यात ७ कुख्यात नक्षलवाद्यांना अटक करण्यात सुरक्षा दलांना यश आलं. त्यामुळे निवडणूक काळात कर्तव्य बजावणाऱ्या जवानांचं मनोबल उंचावलं आहे. याबाबत कामा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी माहिती दिली. ते म्हणाले की, ''सुरक्षा दलांनी किस्त्रम परिसरात शोधमोहीम राबवली होती. या शोधमोहिमेदरम्यान ७ कुख्यात नक्षलवाद्यांना अटक करण्यात सुरक्षा दलांना यश आलं. पकडण्यात आलेल्या नक्षलवाद्यांची माडवी देवा उर्फ दिनेश मडवी, बंजाम पोज्जा, कावासी उर्फ वांडो आयता, कलमू गंगा, कलमू सन्ना, नुप्पो पोज्जा आणि रवा जोगा अशी नावं आहेत.''

### कुख्यात नक्षलवाद्यावर होते एक लाखाचं बक्षीस :

**सुकमा जिल्ह्यात पकडण्यात आलेल्या ७ नक्षलवाद्यांचा निवडणूक काळात घातपात घडवण्याच्या प्रयत्नात होते, असा दावा सुरक्षा दलांकडून करण्यात आला. ''पकडण्यात आलेला कुख्यात नक्षलवादी कावासी उर्फ वांडो अयाता हा टेटमगुडू रिव्होल्युशनरी कौन्सिल ( ींइण ) च्या अंतर्गत कार्यरत असलेल्या ''दंडकारण्य आदिवासी किसान मजदूर संघटना'' (अखश्ए) या संघटनेचा अध्यक्ष होता. दंडकारण्य आदिवासी किसान मजदूर संघटना ही संघटना नक्षलवाद्यांची आघाडीची संघटना आहे. बंजाम पोज्जा बेकायदेशीर संघटना असलेल्या किस्तराम एरिया समितीच्या पदियारो परिवार समितीचा अध्यक्ष आहे. कलमू गंगा उप मिलिशिया कमांडर होता. बाकीचे नक्षलवादी विविध पदावर नक्षलवादी संघटनेत कार्यरत होते,'' अशी माहिती पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी दिली.**

# अयोध्येत रामलल्लाच्या दर्शनाला देण्यात येणारे व्हीआयपी दर्शन बंद



**अयोध्या :** राम मंदिराच्या उद्घाटनानंतर पहिल्या रामनवमीला रामनगरीतील भव्य मंदिरात रामलल्लाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. रामनवमीच्या निमित्त रामनगरीत लाखो भाविक येतील, असा अंदाज आहे. त्यामुळं सुरक्षेच्या कारणास्तव १५ ते १८ एप्रिल चार दिवस व्हीआयपी दर्शन व्यवस्था बंद करण्यात आलीय. तसंच आरतीसाठी देण्यात येणारा पासही रद्द करण्यात आला आहे. यासोबतच आधीचं केलेलं ऑनलाइन बुकिंगही रद्द करण्यात आल्याचं ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी सांगितलंय.

रविवारी मंदिर बांधकाम समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा आणि ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी जन्मभूमी संकुलातील रामनवमी मेळ्याच्या तयारीचा आढावा घेतला. संकुलात प्रवासी सुविधांची तयारी पूर्ण झाल्याचं ट्रस्टचे सदस्य डॉ. अनिल मिश्रा यांनी सांगितलं.

**फुलांनी परिसर सजला :** प्राणप्रतिष्ठेनंतर पहिल्यांदाच मंदिर परिसरात रामनवमीचं आयोजन करण्यात येणार आहे. संपूर्ण परिसर फुलांनी सजवला जात असतानाच राम मंदिरात रामनवमीच्या दिवशी भव्य उत्सवाचं आयोजन करण्यात येणार आहे. या काळात अयोध्येत येणाऱ्या भाविकांना रामलल्लाचं दिव्य दर्शनही मिळणार आहे. श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी याबाबत विशेष व्यवस्था केलीय.

**सात ओळींमधून भाविक मंदिरापर्यंत पोहोचतील :** ट्रस्टचे सरचिटणीस म्हणाले की, ''रामनवमीच्या दिवशी रामलल्लाच्या दर्शनासाठी भाविक जन्मभूमी मार्गावरुन सात रांगांमधून प्रवेश करतील. मंदिर परिसरातून बाहेर पडताना रामललाचा प्रसादही त्यांना दिला जाणार आहे.

दर्शन व्यवस्थेत सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. राम मंदिरात भाविक शांततापूर्ण आणि सुरक्षिततेनुसारच प्रवेश करतील. भाविकांनी मोबाईल फोन, शूज, चप्पल आदी वस्तू सोबत घेऊन दर्शनासाठी मंदिरात पोहोचू नये.''

**मोठा पोलीस बंदोबस्त :** पोलीस अधीक्षक, (शहर) मधुबन सिंह यांनी सांगितलं की, ''यावेळी रामनवमीच्या दिवशी अयोध्येत भाविकांची संख्या जास्त असणार आहे. संपूर्ण फेअर एरियाचं झोन आणि सेक्टरमध्ये विभाजन करण्यासोबतच मुख्य स्टॅटिक पॉइंट्सही तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक झोनमध्ये अतिरिक्त पोलिस अधीक्षक तर सेक्टरमध्ये पोलिस उपअधीक्षक आणि निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आलीय. घाट सुरक्षित करण्यासाठी जल पोलीस, एनडीआरएफ, एसडीआरएफ आणि पूर निवारणाच्या दोन पीएसी कंपन्याही तैनात करण्यात आल्या आहेत. यात ११ अतिरिक्त पोलिस अधीक्षक, १५० निरीक्षक, ४०० उपनिरीक्षक आणि ११०० हवालदार बंदोबस्तात आहेत.

**रामनगरीची ७ झोन आणि ३९ सेक्टरमध्ये विभागणी : रामनवमीनिमित्त रामनगरीची सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आलीय. संपूर्ण शहर ७ झोन आणि ३९ सेक्टरमध्ये विभागलं गेलंय. यात सिव्हिल पोलीस, आरएएफ, एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि पीएसी तैनात करण्यात आले आहेत. तसंच शरयू घाटापासून मंदिरापर्यंत कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. रामपथ, भक्तीपथ, जन्मभूमी पथ येथे बॅरीकेट्सद्वारे गर्दी नियंत्रित केली जाईल. आयजी प्रवीण कुमार यांनी गोंडा आणि बस्ती जिल्ह्यातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. आसपासच्या जिल्ह्यांना जोडणाऱ्या मार्गावरील सुरळीत वाहतूक व्यवस्थेबाबत नियोजन केलंय.**

# इराणच्या इस्रायलवरील हल्ल्याबाबत केविन पीटरसनची पोस्ट चर्चेत

**दिल्ली :** भारतात सध्या आयपीएलचा माहोल असतानाच इराण आणि इस्रायल या दोन देशातील तणावात्मक परिस्थितीने पुन्हा लक्ष वेधले. १४ एप्रिलला आलेल्या वृत्तानुसार इराणने त्यांच्या हद्दीतून इस्रायलवर ड्रोन आणि क्षेपणास्र हल्ला चढवला. इंग्लंड क्रिकेट संघाचा माजी कर्णधार केविन पीटरसनने या क्षेपणास्रांच्या घटनेच्या प्रसंगाचा फार जवळून अनुभव घेतला आणि तेव्हा नेमकं काय घडलं, याची माहिती ट्विट करून दिली आहे.

आयपीएलमधील एल क्लासिको सामन्यासाठी म ुंबईला परतताना पीटरसनसोबत ही घटना घडली. इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्रे डागली आणि त्यामुळे त्यांच्या विमानाला आपला मार्ग बदलून अधिक इंधन भरावे लागले. पीटरसनने हा प्रसंग सांगताना म्हटले, 'असे आतापर्यंत कधीच घडले नव्हते. इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यापासून बचावण्यासाठी आमच्या विमानाला रात्री मार्ग बदलावा लागला. त्यासाठी विमाना पुन्हा परतावे लागले आणि अधिक इंधन भरावे लागले.

आता मी मुंबईत आहे आणि थोड्याच वेळात वानखेडे स्टेडियमवर असेन, जे माझ्या आवडत्या क्रिकेट मैदानांपैकी एक आहे.'

केविन पीटरसन आयपीएल २०२४ च्या सुरुवातीला कॉमेंट्री करताना दिसले होते. पण या महिन्याच्या सुरुवातीला पीटरसन पुन्हा इंग्लंडला परतला होता.

जवळपास दोन आठवडे कुटुंबासोबत घालवल्यानंतर तो पुन्हा एकदा कॉमेंट्रीच्या मैदानात परतला आहे. रविवारी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. यात पीटरसन कॉमेंट्री करताना दिसणार आहे.

# पावसाने माघार घेताच उकाड्यात प्रचंड वाढ

**नागपूर :** मागील संपूर्ण आठवड्यात वादळीवारा आणि गारपिटसह झालेल्या पावसाने विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात शेतपिकांचे आणि फळ बागांचे मोठे नुकसान केले. दरम्यान, या पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरीही तो तेव्हढ्यापुरताच होता. राज्याच्या अनेक भागातून पावसाने माघार घेताच उकाड्यात प्रचंड वाढ झाली आहे. रविवार १४ एप्रिलला तापमानात वाढ नोंदवली गेली तर उकाडा देखील प्रचंड वाढला. येत्या काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होणार असून उकड्यातही वाढ होईल असे संकेत हवामान खात्याने दिले आहेत.

अवकाळी पाऊस येण्यापूर्वी विदर्भात सर्वोच्च तापमानाची नोंद झाली होती. विदर्भातील तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअस पेक्षा अधिक नोंदवला गेला. अवकाळी पावसामुळे तो खाली आला होता. ४० अंश सेल्सिअसपेक्षाही तो कमी नोंदवला गेला. मात्र, आता हवामान खात्याने येत्या काही दिवसांत तापमानात मोठी वाढ होईल असा इशारा दिला आहे. विदर्भासह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा तसेच मुंबईत देखील ही तापमानवाढ होऊ शकते.

कमाल तापमानसह किमान तापमानातदेखील वाढ होण्याचे संकेत आहेत. दरम्यान, बुलढाणा, अकोला, अमरावती, नागपूर, वर्धा, यवतमाळ, जालना या जिल्ह्यांमध्ये आजही वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# माती वाहणारा टिप्पर उलटून ५ जणांचा बळी

**बंगळुरू :** माती वाहणारा टिप्पर रस्त्याच्या बाजुला उभ्या असलेल्या नागरिकांवर उलटून एकाच कुटुंबातील ५ नागरिकांचा मृत्यू झाला. ही घटना बागलकोटमधील बिलागी तालुक्यातील यत्नती क्रॉसजवळ रविवारी रात्री घडली. यंकप्पा शिवाप्पा तोलामट्टी (७२), येल्लावा यंकाप्पा तोलामट्टी (६६), पुंडलिक यंकप्पा तोलामट्टी (४०), नागव्वा अशोक बम्मन्नवरा आणि अशोक नागप्पा बम्मन्नवरा ( ४० ) अशी मृत नागरिकांची नावं आहेत.

शेतात काम करुन घरी परत जात होते नागरिक : यत्नती इथल्या एकाच कुटुंबातील पाच नागरिकांचा टिप्परखाली दबून मृत्यू झाल्यानं मोठी हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. हे पाच नागरिक शेतात काम करुन बदरदिनी या गावी परत जात होते. ते यत्नती क्रॉसजवळ रस्त्याच्या कडेला उभे होते. यावेळी त्यांच्यावर काळानं घाला घातल्यानं त्यांचा मृत्यू झाला.

टायर फुटल्यानं टिप्पर उलटला : पाच नागरिकांचा बळी घेणारा टिप्पर हा माती वाहणारा असल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. हा टिप्पर भरधाव वेगानं जात होता. यावेळी यत्नती क्रॉसजवळ या भरधाव टिप्परचा टायर फ ुटल्यानं तो रस्त्याच्या बाजुला उभ्या असलेल्या नागरिकांवर उलटला. याच एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला.

अपघातानंतर वाहन चालकानं काढला पळ : भरधाव टिप्परनं पाच नागरिकांचा बळी घेतल्याची माहिती वाऱ्यासारखी परिसरात पोहोचली. त्यामुळे बदरदिनी इथल्या हजारो नागरिकांनी घटनास्थळाकडं धाव घेतली. मात्र अपघातानंतर वाहन चालक घटनास्थळावरुन पसार झाला. याप्रकरणी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळावर धाव घेतली. अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक प्रसन्न देसाई यांनी घटनास्थळी धाव घेत घटनास्थळाचा आढावा घेतला. ''पोलिसांनी टिप्परखाली दबलेल्या मृतदेहांना बाहेर काढलं आहे. हे मृतदेह शवविच्छेदनासाठी तालुका रुग्णालयात पाठवले आहेत. या अपघात प्रकरणी बैरागी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे,'' अशी माहिती अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक प्रसन्न देसाई यांनी दिली आहे.

# बाळराजेंच्या फाउंडेशनला कोट्यवधींचा खर्च, संजय राऊतांचे श्रीकांत शिंदेंवर आरोप

**मुंबई :** भाजपने लोकसभा निवडणुकीसाठी संकल्प पत्र जाहीर केलं. मोदी की गॅरंटी नावाने असलेल्या या संकल्प पत्रात अनेक आश्वासने देण्यात आली आहेत. यात भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल असंही म्हटलं आहे. यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी जोरदार हल्लाबोल केला. संजय राऊत म्हणाले की, ''गेल्या काही दिवसांपासून मी सातत्याने प्रधानमंत्री मोदी यांची महाराष्ट्रात भाषण ऐकतो आहे. मोदींबरोबरचे जे मित्रपक्ष आहेत त्यांची भाषण देखील ऐकत आहे. मोदींची गॅरंटी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाला तो देखील मी पाहिला आहे.'' यावेळी संजय राऊत यांनी खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावरही आरोप केले आहेत. श्रीकांत शिंदे यांच्या फाउंडेशनच्या माध्यमातून भ्रष्टाचार झाल्याचा आरोप राऊतांनी केलाय.

प्रत्येक जाहीरनाम्यात भ्रष्टाचार करणाऱ्या व्यक्तींचा समूळ उच्चाटन करून असं लिहिल आहे. गेल्या दीड दोन वर्षात सगळे भ्रष्टाचारी लोक मोदींनी आपल्या पक्षात घेतले. हे ढोंग आहे तरीदेखील आम्ही प्रधानमंत्र्यांवर विश्वास ठेवतो. निवडणूक रोखे घोटाळा हा या विश्वातला सगळ्यात भयंकर घोटाळा आहे. अनेक ठेकेदार, दारूवाले, कंत्राटदार यांना हजारो कोटींची कामे द्यायची आणि त्या बदल्यात निवडणूक रोखे माध्यमातून भाजपाच्या निधीमध्ये हजारो कोटी रुपये जमा करायचे हा गोरख धंदा भाजपने सुरू केल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला.

संजय राऊत म्हणाले की, भाजपच्या कुठल्याच व्यवहारात पारदर्शकता नाही. पी एम केअर फंडाचा हिशोब नाही. तो खाजगी ट्रस्ट आहे पण सरकारी असल्याचा दाखवून कोटी रुपये गोळा केले. अशा प्रकारचा एक छोटा घोटाळा महाराष्ट्रात आहे. नितीन सातपुते यांनी धर्मदाय आयुक्तांकडे रीतसर माहिती मागविली आणि तक्रार केली. श्रीकांत शिंदे यांचे व्यवहार काय आहेत या संदर्भात माहिती मागितली.

नगर मधील ३५ मुलांना ९० लाखांचे अर्थसहाय्य दिले. गणेश उत्सवासाठी ५००-६०० एसटी गाड्या बुक केल्या गेल्या. याचे पैसे कोणी भरले हा मुद्दा आहे. बाळराजांच्या फाउंडेशन करता कोट्यावधी रुपये खर्च झालेले आहेत. हे सरकारचे बाळराजे आहेत. चंदा दो धंदा लो याच माध्यमातून हे पैसे गोळा करत आहेत. सातपुते यांनी धर्मदाय आयुक्तांकडे मागणी केली की यांची बॅलन्स शीट कुठून त्यांना फंड मिळाला याची माहिती द्या. धर्मदाय आयुक्त प्रचंड दबावाखाली आहेत पाच महिन्यांपासून माहिती दिली जात नाही असंही संजय राऊत म्हणाले.

श्रीकांत शिंदे यांच्या खात्यामध्ये गेल्या काही वर्षात ४० ते ५० लाखांचे उलाढाल होते. पण त्यांनी खर्च दाखविला आहे. त्यांच्या घोषणा या काही कोटींमध्ये आहेत. हे पैसे कुठून येतात? हे दानशूर आणि करणाचे अवतार कोण आहेत? त्याचा हिशोब व्यवहार धर्मदाय आयुक्तकडे नाही याचा अर्थ स्पष्ट आहे. मुख्यमंत्री कार्यालयात बसून बिल्डर ठेकेदारांना तुम्ही कंत्राट देत आहात. राजांच्या जवळच्या व्यक्तीला आठ हजार कोटींचा ॲम्बुलन्स कॉन्ट्रॅक्ट दिला. फाउंडेशनच्या माध्यमातून रोखित पैसे वळवायचे आणि हा पैसा राजकारणात वापरायचा. गद्दार आमदार खासदारांना आपल्याकडे वळविण्यासाठी हा पैसा वापरला जातोय उद्याच्या निवडणुकीसाठी हा पैसा वापरला जातो असा गंभीर आरोप संजय राऊत यांनी श्रीकांत शिंदे यांच्यावर केला.

साडेपाचशे ते सहाशे कोटी रुपये या कंपन्यांकडून कोट्यावधींची अशी लूट करण्यात आली आहे. मनी लाँडरिंग पी एम एल ए फॅक्ट सारखा कायदा आहे या नुसार दिसते. तुमच्या फाउंडेशन वर नक्की कोण काम करतं? कुटुंबातील लोक आहेत का की इतर कोण लोक आहेत पैसे गोळा करायला? असा प्रश्नही राऊतांनी विचारला.

कार्यक्रमासाठी येणाऱ्या कलाकारांना म ोठ्या विदेशी पैसे कोणाकडून दिले जनतेला याचा हिशोब द्यावा लागेल. मुलुंडचे नागडे पोपटलाल हिशोब मागतात ते स्वत: अकाउंटंट आहेत माझा आवाहन आहे

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती नवी दिल्ली येथे संसद भवनाच्या हिरवळीवर डॉ.आंबेडकर फाऊंडेशनकडून साजरी

**नवी दिल्ली :** भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने डॉ. आंबेडकर फाऊंडेशनने १४ एप्रिल २०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४वी जयंती साजरी केली. संसद भवनाच्या हिरवळीवर डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ हा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमात सुरुवातीला आज सकाळी राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभा अध्यक्ष, मंत्री, संसद सदस्य आणि इतर मान्यवरांनी पुष्पांजली अर्पण केली.

संसद भवनाच्या हिरवळीवर असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी हा संपूर्ण कार्यक्रम लोकांसाठी खुला ठेवण्यात आला होता. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षम ीकरण मंत्रालयाच्या वतीने डॉ. आंबेडकर फाऊंडेशनतर्फे दरवर्षी डॉ. आंबेडकर जयंती साजरी करण्यात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक द्रष्टे नेते, समाजसुधारक, थोर कायदेतज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि राजनीतीज्ञ होते. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ते ओळखले जातात. उपेक्षित समुदायांसाठी त्यांनी केलेले कार्य संस्मरणीय आहे. सामाजिक न्याय, समता आणि लोकशाहीवरचे त्यांचे विचार पिढ्यांपिढ्यांना प्रेरणा देत आले आहेत.

कार्यक्रमात २५ बौद्ध भिक्खूंनी बौद्ध मंत्रोच्चार केले. गीत आणि नाट्य विभागातील कलाकारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित गीतांचे सादरीकरण केले. १३४ व्या आंबेडकर जयंती निमित्त संसद भवनाच्या हिरवळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यासाठी हजारो लोकांनी गर्दी केली होती. या कार्यक्रमात सचिव सौरभ गर्ग, तसेच डॉ. आंबेडकर फाऊंडेशनचे सदस्य सचिव प्रभात कुमार सिंग आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

डॉ. आंबेडकर फाऊंडेशन आणि मंत्रालयातील अधिकारी यांच्या प्रयत्नांमुळे बाबासाहेब डॉ.बी.आर.आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती उत्सवाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

डॉ. आंबेडकर फाऊंडेशन

भारतरत्न डॉ. बी.आर. आंबेडकर यांचा संदेश आणि विचारप्रसार करण्यासाठी डॉ. आंबेडकर फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली. १९९१ मध्ये बाबासाहेब डॉ. बी.आर. आंबेडकर जन्मशताब्दी उत्सव समितीची स्थापना करण्यात आली होती आणि या समितीचे अध्यक्षपद भारताच्या तत्कालीन पंतप्रधानांकडे होते. या समितीने डॉ. आंबेडकर फाऊंडेशन (डीएएफ) स्थापन करण्याचा निर्णय घेतला. २४ मार्च १९९२ रोजी, डॉ. आंबेडकर फाऊंडेशन (डीएएफ) ही एक स्वायत्त संस्था सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली स्थापन करण्यात आली. राष्ट्रीय स्तरावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि दृष्टिकोन सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी या संस्थेने अनेक कार्यक्रम आयोजित केले आणि विविध उपक्रम राबविले आहेत.

प्रसिद्ध समाजसुधारक, वक्ते, महान लेखक, इतिहासकार, न्यायशास्त्रज्ञ, मानववंशशास्त्रज्ञ आणि राजकारणी बाबासाहेब डॉ. बी.आर. आंबेडकर यांचा जीवनप्रवास, त्यांचे कार्य आणि योगदान यांचे जतन आणि प्रदर्शन करण्यासाठी डॉक्टर आंबेडकर राष्ट्रीय स्मारक संग्रहालय समर्पित आहे. डॉ. आंबेडकर राष्ट्रीय स्मारक संग्रहालयात डॉ. आंबेडकर यांच्या जीवनाशी संबंधित त्यांच्या वैयक्तिक वस्तू तसेच त्यांचे शिक्षण, सामाजिक सुधारणा चळवळी आणि राजकीय कारकीर्द यांच्याशी छायाचित्रे, पत्रे आणि कागदपत्रे यांचाही संग्रह आहे. या संग्रहालयात बाबासाहेबांची निवडक भाषणे आणि मुलाखती दृकश्राव्य स्वरूपात उपलब्ध आहेत.

# फतेहपूरमध्ये झालेल्या भीषण अपघातात सात जणांचा होरपळून मृत्यू

**फतेहपूर (सीकर) :** राजस्थानमधील सीकर जिल्ह्यातील फतेहपूरमध्ये कारचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात सात जणांना प्राण गमावावे लागले. अपघातानंतर दोन्ही वाहनांनी पेट घेतल्यामुळं त्यातील ७ जणांचा होरपळून मृत्यू झाला. यामध्ये २ लहान मुलींचाही समावेश आहे. हे सर्व जण मेरठ, उत्तर प्रदेशचे रहिवासी होते.

सात जणांचा होरपळून मृत्यू : फतेहपूर येथे राष्ट्रीय महामार्गावर मागून येणाऱ्या ट्रकला कार धडकल्यामुळं सात जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. अपघातानंतर दोन्ही वाहनांनी पेट घेतला त्यामुळं प्रवाशांना बाहेर पडता आलं नाही. महामार्गावरील अपघाताची माहिती मिळताच पोलीस, स्थानिक प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. यासोबतच अग्निशमन दलाच्या गाड्याही घटनास्थळी दाखल झाल्या आहेत.

अपघात होताच कारला आग : कोतवाल सुभाष बिजारनियान यांनी सांगितलं की, कार पाठीमागून फतेहपूरजवळील सालासर पुलिया येथे चुरूकडे जाणाऱ्या ट्रकला धडकली, ज्यामुळं ट्रक आणि कार दोघांनाही आग लागली. कारमध्ये बसवण्यात आलेल्या गॅस किटमुळं आगीनं भीषण रूप धारण केलं. त्यामुळं कारमधील सातही जण जिवंत जळून खाक झाले. यामध्ये २ मुलांचाही समावेश आहे. त्याचवेळी ट्रकमध्ये धाग्याचे रोल ठेवण्यात आले होते. त्यांनाही आग लागली. स्थानिक लोकांच्या मदतीनं पोलिसांनी सर्व मृतदेह स्थानिक उपजिल्हा रुग्णालयात पाठवले आहेत.

बालाजीचं दर्शन घेऊन परतताना मृत्यू : पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कारमध्ये सापडलेला मोबाईल फोन चालू असताना मृतांच्या नातेवाईकांशी बोलणं सुरू होतं. सर्व मृतक मेरठचे रहिवासी होते. ते सालासर बालाजीचं दर्शन घेऊन परत मेरठला जात होते. यावेळी फतेहपूरजवळ त्यांचा अपघात झाला. मृतांमध्ये मुकेश गोयल, नीलम गोयल, आशुतोष गोयल, मंजू बिंदल, महेश बिंदल, हार्दिक बिंदल, स्वाती बिंदल, दीक्षा बिंदल तसंच एका लहान मुलीचा समावेश आहे. पोलिसांनी मृतांच्या कुटुंबीयांना माहिती दिली आहे. नातेवाईक आल्यानंतर सोमवारी मृताचे शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.